सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - ३ रे ❏ अंक - १४३ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ सोमवार दि. ३० जून २०२५ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६

## अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी ५७ हजार ५०९ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०मुंबई**

विधीमंडळाच्या जून २०२५ च्या पावसाळी अधिवेशनात उपमुख्यमंत्री तथा राज्याचे वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या विधीमंडळात सादर केल्या. हा निधी प्रामुख्याने राज्यात रस्ते, मेट्रो, सिंचन योजनांसारख्या पायाभूत प्रकल्पांसाठी, सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन व अंमलबजावणी, महात्मा ज्योतीराव फुले आरोग्य योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, मागास विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तसेच दुर्बल, वंचित समाजघटकांच्या विकासासाठी उपयोगात आणण्यात येणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या पुरवणी मागण्यांपैकी



१९ हजार १८३ कोटी ८५ लाख रुपये अनिवार्य तर ३४ हजार ६६१ कोटी ३४ लाख रुपये कार्यक्रमांतर्गत आणि ३ हजार ६६४ कोटी ५२ लाख रुपये केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने पुरवणी मागण्या आहेत. स्थूल पुरवणी मागण्या ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या असल्या तरी त्याचा प्रत्यक्ष निव्वळ भार हा ४० हजार ६४४ कोटी ६९ लाख रुपयांचा आहे.

उपमुख्यमंत्री तथा राज्याचे वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी आज सादर केलेल्या ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्यांपैकी सर्वाधिक ११ हजार ४२ कोटी ७६ लाख रुपये हे पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार अनुदानांसाठी खर्च होणार आहेत. तीन हजार २२८ कोटी ३८ लाख रुपये हे मेट्रो प्रकल्प, महापालिका, नगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा यांच्या मुद्रांक शुल्क अधिभार परताव्यापोटीचे आहेत. राष्ट्रीय सहकार विकास निगम (एनसीडीसी) यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत सहकारी सहकारी साखर कारखान्यांना खेळत्या भागभांडवलासाठी मार्जिन मनी लोनसाठी दोन हजार १८२ कोटी ६९ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

## शॉक लागून नागपुरातील दोन वारकऱ्यांचा मृत्यू; टेंट उभारताना घडली दुर्घटना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०फलटण**

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात फलटणजवळ विसाव्यासाठी नागपुरातील थांबलेल्या दोन वारकऱ्यांचा वीजेचा शॉक लागून मृत्यू झाला. मधुकर तुकारामजी शेंडे (५६, राजाबक्षा, नागपूर) व तुषार रामेश्वर बावनकुळे (२२) असे मृतक वारकऱ्यांची नावे आहेत. दोघेही निस्सिम विठ्ठलभक्त होते. शेंडे हे नेहमीप्रमाणे यंदादेखील उत्साहाने वारीत सहभागी झाले. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचा रविवारचा मुक्काम बरड (ता. फलटण) येथे होता.



बरड जवळील टोलनाका येथे मुक्कामसाठी टेंट उभारताना तुषार यांने लोखंडी रॉडला हात लावल्यानंतर त्यांना शॉक बसला. तुषार रॉडला चिटकल्याने त्यांना बाजूला काढण्यासाठी पुढे आलेले मधुकरराव हेही तुषार यांना चिटकले. तेव्हा दोघांना विजेचा शॉक बसला. त्यावेळी जवळच्या काही वारकऱ्यांनी तत्काळ १०८ ॲम्ब्युलन्सला कॉल केला. दोघांनाही उपचारासाठी दुपारी ४.५० वाजण्याच्या सुमारास नातेपुते येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकारी डॉ. नम्रता व्होरा यांनी दोघेही उपचारापूर्वी मरण पावल्याचे घोषित केले.

या घटनेमुळे त्यांच्या सहकारी वारकऱ्यांमध्ये शोककळा पसरली होती. शेंडे हे अविवाहित होते व त्यांनी संपूर्ण जीवन वारकरी सेवा व समाजसेवेला अर्पण केले होते. ते बावणे कुणबी समाज केंद्रीय संस्थेचे सक्रिय सदस्य होते.

## ५ जुलैला विजयी मेळावा होईल, पण तो कोणत्याही पक्षाचा नसेल - राज ठाकरे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०मुंबई**

पहिलीपासून हिंदी शिकवण्याच्या निर्णयाविरोधात विरोधी पक्षांनी आवाज उठवल्यावर राज्य सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार त्रिभाषा सूत्र लागू करण्याचे दोन शासकीय आदेश रद्द करण्याची घोषणा केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर रविवारी हा निर्णय जाहीर केला. ठाकरे बंधूंच्या मोर्च्याच्या पार्श्वभूमीवर सरकारने हिंदीच्या मुद्द्यावरुन माघार घेतली. त्यानंतर आता मनसे आणि ठाकरेंच्या शिवसेनेकडून आयोजित करण्यात आलेला ५ जुलैचा मोर्चा रद्द करण्यात आला असून त्याऐवजी विजयी मेळावा घेण्यात येणार आहे. दोन्ही पक्षांनी त्यासंदर्भात सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. मात्र मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी हा मेळावा कोणत्याही पक्षाचा नसेल असं स्पष्ट शब्दांत सांगितले आहे.



हिंदी शिकवण्याच्या निर्णयावरुन सरकारने माघार घेतल्यानंतर सरकारने पावसाळी अधिवेशनाआधी त्रिभाषा सूत्राचा शासन निर्णय रद्द केला. त्रिभाषेच्या संदर्भात धोरण ठरवण्यासाठी नवीन समिती स्थापन करण्यात आली असून त्याच्या अहवालावर कितवी पासून हिंदी शिकवण्यात यावी याचा निर्णय घेण्यात येणार आहे. दुसरीकडे, त्रिभाषा सक्तीचा शासन निर्णय रद्द करण्याचा निर्णय जाहीर केल्याने मनसे आणि ठाकरेंच्या शिवसेनेचा ५ जुलै रोजी निघणारा मोर्चा रद्द करुन त्याऐवजी विजयी मेळावा होणार आहे. याबाबत राज ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत आपली भूमिका मांडली.

या निर्णयानंतर काल मला संजय राऊतांचा फोन आला होता. त्यांनी विचारलं यापुढे काय करायचं. मी म्हटलं मोर्चा रद्द करावा लागेल. ते म्हणाले की आपण एक विजयी मेळावा घ्यायला पाहिजे. मी घेऊया असं म्हटलं. माझ्या लोकांसोबत चर्चा केल्या नंतर आपण ठरवूया. पाच तारखेला काय करायचं अजून काही ठिकाण ठरलेलं नाही. मी माझ्या सहकाऱ्यांशी बोलेन. माझे सहकारी त्यांच्याशी बोलतील. त्यातून पाच तारखेचा मेळावा होईल. तो मेळावा जरी झाला तरी त्याला पक्षीय लेबलं लावण्यात काही अर्थ नाही. हा विजय खरातर मराठी माणसाचा आहे. त्या दृष्टिकोनातूनच या मेळाव्याकडे पाहिलं पाहिजे, असं राज ठाकरे म्हणाले.मराठी भाषेच्या विरोधात उद्या कोणी जरी असेल माझा त्याला विरोध असेल. महाराष्ट्रातील प्रत्येक राजकीय नेत्याला माझी विनंती हीच राहील की मराठी महाराष्ट्र या विषयावर कुठल्याही प्रकारची तडजोड होता कामा नये. यापुढे सर्वांनी सतर्क राहणे आवश्यक आहे. सर्व बाजूंनी महाराष्ट्राचे लचके तोडण्याचे प्रकार सुरू आहे. हे थांबवणे आवश्यक आहे. मराठी माणसाने देखील आजूबाजूला काय गोष्टी घडत आहेत यासाठी जागृत राहणे आवश्यक आहे, असंही राज ठाकरे म्हणाले.

## पदे मंजूर तरीही राज्य आयएफएस पोस्टींगच्या वेटिंगवर

### एकूण १८२ अधिकाऱ्यांची पदे मंजूर, भारतीय वन सेवेच्या अधिकाऱ्यांचे कुरघोडीचे राजकारण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

वन विभागात पदे मंजूर असताना महाराष्ट्र वनसेवेतील 'आयएफएस' अवॉर्डप्राप्त अधिकाऱ्यांना वेटिंगवर ठेवण्यात आले आहे. २७ अधिकारी आयएफएस झाले असले तरी केवळ तीनच अधिकाऱ्यांना पोस्टिंग देण्यात आली आहे. २४ अधिकारी 'होल्ड' कशासाठी, असा सवाल उपस्थित होत आहे. यात आयएफएस लॉबीचे अंतर्गत कुरघोडीचे राजकारण असल्याचे चित्र आहे. भारतीय वन सेवा संवर्गाच्या अधिकाऱ्यांचे बदलीचे आदेश बहुप्रतीक्षेनंतर २४ जून २०२५ रोजी शासनाने जारी केले आहे. ३९ अधिकाऱ्यांच्या बदली आदेशात गडबड असल्याचे निदर्शनास आले आहे.



महाराष्ट्र वन विभागामध्ये केंद्र शासनाकडील १२ ऑगस्ट २०१६चे मंजूर संवर्ग आराखड्यानुसार प्रधान मुख्य वनसंरक्षक संवर्गाची ३ पदे, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक संवर्गाची १५ पदे, मुख्य वनसंरक्षक संवर्गाची ३४ पदे, वनसंरक्षक संवर्गाची १५ पदे, उपवनसंरक्षक या संवर्गाची ५९ पदे मंजूर होती. भारतीय वन सेवा संवर्गाचा आराखडा प्रत्येकी चार ते पाच वर्षानंतर होत असतो. यानुसार सन २०२१चा संवर्ग पुनर्विलोकन आराखडा शासनाकडे मंजुरी करता सादर करण्यात आला आहे. सन २०२१च्या प्रस्तावित संवर्ग पुनर्विलोकन आराखड्यामध्ये प्रधान मुख्य वनसंरक्षक संवर्गाची ४ पदे, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक ९ पदे, मुख्य वनसंरक्षक संवर्गाची १२ पदे, वनसंरक्षक संवर्गाची १५ पदे, तर उपवन संरक्षक या संवर्गामध्ये सुमारे ८६ पदे प्रस्तावित केल्याचे दिसून येते.

### वन विभागात १८२ अधिकारी पदे मंजूर

केंद्र शासनाचे भारतीय वन सेवा वेतन नियम २०१६चे नियम १२ अन्वये केंद्रीय प्रतिनियुक्तीची २५ पदे व राज्य प्रतिनियुक्तीची ३१ पदे महाराष्ट्र वन विभागामध्ये मंजूर आहेत. अशा प्रकारे महाराष्ट्र वन विभागामध्ये एकूण १८२ अधिकारी कार्यरत राहू शकतात. इतक्या मोठ्या प्रमाणात पदे उपलब्ध असताना सद्यस्थितीत महाराष्ट्र वनसेवेतून भारतीय वन सेवेमध्ये पदोन्नती झालेल्या अधिकाऱ्यांना पदस्थापनेकरीता पद उपलब्ध होत नाहीत, ही मोठी शोकांतिका म्हणावी लागेल.

### आयएफएस अधिकाऱ्यांची 'प्रादेशिक' पसंती

मूळ संवर्गात पाच वर्षे किंवा अधिकची सेवा झालेल्या पात्र अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीवर पाठवण्याबाबत राज्य वन विभागामार्फत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात येत नाही. किंबहुना प्रतिनियुक्तीवर जाण्यास कोणीही तयार नसल्याचे चित्र सद्यस्थितीत वनविभागात आहे. वनविभागातील भावसे अधिकाऱ्यांना आर्थिकदृष्ट्या फायद्याचे प्रादेशिक विभागाची पदस्थापना किंबहुना मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, कोल्हापूर अशा महत्त्वाच्या ठिकाणी पदस्थापना हवी असल्याचे चित्र तेथील पदस्थापनेकरिता असलेल्या चढाओढीवरून स्पष्ट दिसत आहे.

## उद्यापासून आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना तिकीट दरामध्ये मिळणार १५ टक्के सूट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०मुंबई**

एसटीच्या लांब व मध्यम पल्ल्याच्या (१५० कि.मी.पेक्षा जास्त) प्रवासासाठी आगाऊ आरक्षण करणाऱ्या पुर्ण तिकीट धारी (सवलत धारक प्रवासी वगळून) प्रवाशांना तिकीट दरात १५ टक्के सवलत दिली जाणार आहे. ही योजना दिवाळी व उन्हाळी सुट्टीचा गर्दीचा हंगाम वगळता वर्षभर सुरू राहणार आहे. या योजनेची सुरुवात १ जुलैपासून करण्यात येत आहे. तरी प्रवाशांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन परिवहन मंत्री तथा एसटी



महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

१ जूनला एसटीच्या ७७ व्या वर्धापन दिन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी कमी गर्दीच्या हंगामामध्ये लांब पल्ल्याच्या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी आगाऊ आरक्षण केल्यास त्यांच्या तिकीटामध्ये १५ टक्के सूट देण्यात येईल अशी घोषणा केली होती. त्यानुसार ही योजना सर्व प्रकारच्या बससाठी १ जुलैपासून लागू करण्यात येत आहे. अर्थात, ही योजना पूर्ण तिकीट काढणाऱ्या प्रवाशांसाठीच लागू राहणार आहे.

## विद्यार्थिनींच्या लैंगिक छळ प्रकरणी मुंडे आक्रमक

### आरोपींसोबतच्या फोटोंवरून संदीप क्षीरसागरांवर हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०बीड**

बीडमधून एक धक्कादायक घटना समोर आली होती. येथील एका खाजगी कोचिंग क्लासेसमधील दोन शिक्षकांनी एका अल्पवयीन विद्यार्थिनीचं लैंगिक शोषण केल्याची धक्कादायक बाब समोर आली होती. त्यानंतर या दोन शिक्षकांना अटक झाली आहे. या शिक्षकांचे राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागरांशी



संबंध असल्याचं बोललं जात आहे. यावरून आमदार धनंजय मुंडे यांनी पत्रकार परिषद घेत संदीप क्षीरसागरांवर हल्लाबोल केला आहे.

पवारने पैशांच्या दबावाने अनेक छोटे क्लासेस बंद केले. तसेच त्यांचे संबंध आमदार संदीप क्षीरसागरांशी आहेत. तसेच या प्रकरणी गुन्हा दाखल झाला. त्यारात्री हा आरोपी संदीप क्षीरसागरांबरोबर होता. हे दोघेसोबत का होते? त्यामागील कारण काय? हे पोलीस तपासात आलं पाहिजे. त्यांचे संबंध हे अर्थिक आहेत की, इतर काही. या क्लासेसची चर्चा खूप दिवसांपासून दबून होती.


येथे अल्पवयीन विद्यार्थिनींचं लैंगिक शोषण होत होते. पण यावर आवाज उठवला नाही. पण हा माथेफिरू प्राध्यापक कसा झाला? मी या पिडीत कुटुंबाला भेटतो. तसेच याआरोपीने अनेक नेत्यांसोबत आपले फोटो पोस्ट करून राजकीय दबाव निर्माण केला. त्यातून आपली अर्थिक बाजू भक्कम केली. त्यातून तो प्लॉटींग व्यावसायात आला. या प्रकरणी मी देवेंद्र फडणवीसांकडे एसआयटी नेमण्याची मागणी करणार आहे.

## मार्क मिळाले शंभर पैकी शंभर, कमळी आमची एक नंबर!

### उद्धव ठाकरेंची भाजपवर बोचरी टीका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०मुंबई**

येत्या पाच तारखेला आम्ही विजय उत्सव करणारच आहोत. यासाठी सर्वांशी बोलणं सुरू आहे. आमच्या सोबत जे-जे या आंदोलनात उतरले होते त्या सर्वांची एकजूट या विजय उत्सवात दाखवण्याची गरज आहे. जेणेकरून या सरकारचा कुटील डाव, मराठी-अमराठी करायचं, मराठी माणसात फूट पाडायची. मात्र मराठी माणसात फूट पडत नाही, हे लक्षात आल्यानंतर पुन्हा मराठी माणूस या लढ्यात एकत्र आल्याचे बघून तो पुन्हा एकत्र येऊ



नाही यासाठी सरकारने हा जीआर मागे घेतला. अशी प्रतिक्रिया शिवसेना उबाठा गटाचे सर्वेसर्वा उद्धव ठाकरे यांनी दिली. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनासाठी आज मुंबईतील विधान भावनात उद्धव ठाकरे उपस्थित होते त्यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना ही प्रतिक्रिया दिली.

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशन २०२५ च्या भूषण गाणे उद्धव ठाकरे हे विधिमंडळात दाखल झाले होते. त्यावेळी त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ही प्रतिक्रिया दिली आहे.

## संपादकीय ......

# महिला अत्याचार रोखा

पश्चिम बंगालला महिला मुख्यमंत्री असतानाही राज्यात महिला अत्याचाराच्या वाढत्या घटना क्लेशदायक आणि लाजिरवाण्या आहेत. वर्षही पूर्ण व्हायचे बाकी असताना आणखी एका घटनेने हादरा दिला. गेल्या वर्षी ९ ऑगस्ट रोजी कोलकातामधील मेडिकल कॉलेजमध्ये प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवर तेथीलच डॉक्टरने बलात्कार करून तिची हत्या केल्याच्या घटनेमुळे संपूर्ण देश हळहळला होता. त्याची चर्चा अजूनही सुरू असताना कोलकाता येथील एका विधी महाविद्यालयात विद्यार्थिनीवर माजी विद्यार्थ्यांनी बलात्कार केल्याची घटना समोर आली. महाविद्यालयाच्या तळमजल्यावर विद्यार्थी संघटनेच्या कार्यालयाशेजारी असलेल्या एका सुरक्षारक्षकाच्या खोलीत हा धक्कादायक प्रकार घडला. पीडिता दुपारी काही शैक्षणिक कामासाठी महाविद्यालयात आली होती. त्यावेळी आरोपींनी तिच्यावर अत्याचार केले. धक्कादायक बाब म्हणजे, अत्याचाराचे चित्रीकरणही करण्यात आले. मुख्य आरोपीला महाविद्यालयातील वरिष्ठ विद्यार्थ्यांनीच याबाबतीत मदत केली.

कायद्याचे शिक्षण देणार्या महाविद्यालयातच, तेही सुरक्षारक्षकाच्या खोलीत अशाप्रकारची गंभीर घटना घडावी, हेच थरकाप उडवणारे. आरोपी फौजदारी वकील आहे. स्वतः वकीलच कायद्याची पत्रास न बाळगता बलात्काराचे पाऊल उचलतो, हे संतापजनक तितकेच धक्कादायक! देशभरात माता, बहिणी आणि मुलींवर अत्याचार होण्याचे प्रमाण सातत्याने वाढत असून हे चिंता करायला लावणारे वास्तव आहे. या गुन्ह्यांचा तपास लवकरात लवकर लागून गुन्हेगारांना कडक शिक्षा झाली पाहिजे. प्रशिक्षणार्थी डॉक्टरच्या बलात्कार व हत्येवरून देशात रोष निर्माण झाला होता. ती इतकी क्रूर आणि धक्कादायक होती की, त्यामुळे देशभरातील केवळ डॉक्टरच नव्हे, तर सामान्य जनताही रस्यावर उतरली. आरोपी संजय रॉयला लवकरात लवकर फाशी दिली जावी, अशी जनभावना होती; पण लोकशाहीत जनभावनेनुसार न्याय होत नाही, तर पोलिसांनी तपास त्वरेने करून पुरावे गोळा करावे लागतात.

साक्षीदार उभे करून त्यांना संरक्षणही पुरवावे लागते आणि वेळेवर आरोपपत्र देऊन, उत्तम वकिलांकरवी समर्पक युक्तिवाद करावा लागतो. ही घटना घडून बरेच दिवस झाल्यानंतरही कोलकाता पोलिसांना तपासात लक्षणीय प्रगती करता आलेली नाही, असे निरीक्षण नोंदवून कोलकाता उच्च न्यायालयाने तपास सीबीआयकडे सोपवण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर सीबीआयने आपला तपास सुरू केला. एरव्ही या ना त्या कारणावरून केंद्र सरकारवर तुटून पडणार्या पश्चिम बंगालमधील ममता बॅनर्जी सरकार महिलांचे संरक्षण करण्यात पूर्णपणे अपयशी ठरल्याचे या घटनेवरून दिसून आले होते. आता विधी महाविद्यालयातील या ताज्या घटनेतील मुख्य आरोपी मनोजित मिश्रा हा तृणमूल काँग्रेसची विद्यार्थी संघटना असलेल्या 'तृणमूल छात्र परिषदे'शी संबंधित असून, तो परिषदेचा दक्षिण कोलकाता जिल्ह्याचा संघटन सचिव आहे. तृणमूलसारख्या राजकीय पक्षात काय लायकीच्या लोकांना प्रवेश देण्यात येतो, हे यावरून स्पष्ट होते.पोलिसांनी आरोपींना अटक केली असली, तरी घटनेच्या मुळापर्यंत जाणे आणि सर्व आरोपींना बेड्या ठोकण्याचे आव्हान आहे. कारण, आरोपींची राजकीय पार्श्वभूमी आणि या घटनेवरून उफाळलेले राजकारण! गेल्यावर्षी प. बंगालच्या उत्तर २४ परगणामधील संदेशखाली येथेही तृणमूल काँग्रेसचा बाहुबली शहाजहान शेख याच्यावर महिला अत्याचाराचे शंभरपेक्षा अधिक गुन्हे दाखल होऊनही त्याला बराच काळ पकडले नव्हते. या दोन्ही प्रकरणांत कारवाई करण्यात ममता बॅनर्जी सरकारने टाळाटाळ चालवल्याचे स्पष्ट झाले होते.

# विभागीय आयुक्त कार्यालयात 'राष्ट्रीय सांख्यिकी दिन' उत्साहात साजरा

## देशाच्या प्रगतीमध्ये आणि धोरण निश्चितीमध्ये सांख्यिकीचे महत्व अनमोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती,**

प्रसिद्ध संख्याशास्त्रज्ञ प्रशांतचंद्र महालनोबीस यांचा जन्मदिवस २९ जून भारत सरकारव्दारे 'राष्ट्रीय सांख्यिकी दिन' म्हणुन घोषित करण्यात आलेला आहे. आर्थिक योजना आणि सांख्यिकी विकास या क्षेत्रातील प्रशांतचंद्र महालनोबिस यांच्या कार्याचा गौरव म्हणून देशात सर्वत्र २९ जून हा दिवस राष्ट्रीय सांख्यिकी दिन साजरा करण्यात येतो. यानिमित्त सहसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय व उपायुक्त (नियोजन) विभागीय आयुक्त कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित कार्यक्रमात 'राष्ट्रीय सांख्यिकी दिन' साजरा करण्यात आला.



यावेळी कार्यक्रमात प्रारंभी संख्याशास्त्रज्ञ प्रशांत चंद्र महालनोबीस यांच्या प्रतिमेस मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. कार्यक्रमाला अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, अमरावतीच्या सहसंचालक संध्या गवई, सांख्यिकी उपसंचालक केतकी धरमारे, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे यांच्यासह विभागाचे अधिकारी-कर्मचारी तसेच माजी अधिकारी-कर्मचारी यावेळी उपस्थित होतप्रत्येक देशाच्या प्रगतीमध्ये आणि धोरण निश्चितीमध्ये सांख्यिकीचे महत्व अनमोल असते. सांख्यिकीचा इतिहास हा केवळ आकडे गोळा करण्यापुरता मर्यादित नसून तो देशाला नियोजनाची आणि विकासाची दिशा देणारा आहे. एकेकाळी केवळ आकडे गोळा करण्याचे एक साधन म्हणून पाहिली जाणारी ही सांख्यिकी आज आपल्या जीवनाच्या प्रत्येक पैलूमध्ये निर्णय प्रक्रियेपासून (ऊशलळीळेप चरज्ञळपस) ते भविष्याच्या अंदाजापर्यंत (त्रेीश-लरीींळपस) एक अविभाज्य अंग बनली आहे. आज २१ व्या शतकात आपण माहिती युगात जगत आहोत. इंटरनेट, स्मार्टफोन आणि विविधि डिजीटल उपकरणांमुळे प्रचंड प्रमाणात विदेची (ॠींर) साठवण होत आहे. ही साठलेली माहिती समजून घेणे, तिचे विश्लेषण करणे आणि त्यातून अर्थपूर्ण निष्कर्ष काढणे यामध्ये सांख्यिकीची भूमिका अत्यंत महत्वाची ठरते. सांख्यिकी आपल्याला या माहितीच्या महापुरातून मार्ग काढण्यास, महत्वाचे नमूने ओळखण्यास मदत करते. सामाजिक सर्वेक्षण, रोजगार, शिक्षण, वैज्ञानिक संशोधन, हवामान अभ्यास, पशुधन सर्वेक्षण, वन सर्वेक्षण, व्यवसाय व अर्थव्यवस्थेतील सांख्यिकी आदी विविध महत्वाच्या क्षेत्रात सांख्यिकीचे महत्व अत्यंत महत्वाचे आहे. समाजातील प्रत्येक समस्या समजून घेण्यासाठी सांख्यिकी अनिवार्य आहे. प्राप्त डेटाच्या आधारे अचूक विश्लेषण, निष्कर्ष व त्यानुषंगाने सरकार व प्रशासनाकडून धोरणे ठरविण्यासाठी तिची मदत होते, असे सांख्यिकीशास्त्राचे तज्ञ प्रा. डॉ. हरीहर लुंगे, डॉ. उमेश काळे, सहा. प्राध्यापक ज्ञानेश्वर गटकर यांनी आपल्या भाषणात सांगून सांख्यिकीचे महत्व विशद केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विभागीय आयुक्त कार्यालयातील नियोजन विभागाच्या संशोधन अधिकारी श्रीमती रेखा गुरव यांनी तर सहाय्यक संशोधन अधिकारी नरेंद्र गायकवाड आभार मानले.




## पोटऱ्या दुखतात? जाड, फुगलेल्या पोटऱ्या कमी करा, पाहा अगदी सोपे उपाय,

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक**

आजच्या धावपळीच्या जीवनात असे पोटऱ्या दुखणे, ही अगदीच सामान्य तक्रार झाली आहे. अनेकांना हा त्रास होतो. अनेक वेळा या त्रासाकडे दुर्लक्ष केले जाते. खास म्हणजे महिलांकडून. महिला अशा त्रासांकडे कधीच फार लक्ष देत नाहीत. दुसर्यांची लाख काळजी घेतात, मात्र स्वत:ची नाही. पोटऱ्या नक्की का दुखतात. त्यामागे नेमकी कोमती असतात हे समजून घेणे आणि योग्य उपाय करणे आवश्यक आहे. याचबरोबर, पोटऱ्यांची चरबी कमी करणे आरोग्यासाठी महत्त्वाचे ठरते.

कोणत्याही गोष्टीचा अतिरेक चांगला नाही. मग वजन जास्त वाईट तसेच अति व्यायामही वाईटच. काही जणांचे वजन त्याच्या पायांना पेलवत नाही. त्यामुळे पोटरीवर ताण येतो. स्नायूंना त्रास झाला की पोटऱ्या दुखतात. त्याविरुद्ध काही जण फिटनेस फ्रिक असतात. ते व्यायाम जरा प्रमाणापेक्षा जास्त करतात. शरीराला क्षमतेपेक्षा जास्त व्यायाम करायला लागला तरी पोटऱ्यांवर ताण येतो. उपाय अगदी सोपा आहे. व्यायाम प्रमाणात करा आणि वजन फार जास्त असेल तर ते कमी करा.

पायाच्या दिशेने रक्ताभिसरण व्यवस्थित होत नसेल तरी पोटऱ्यांवर ताण येतो. शरीरात पाण्याची आणि इलेक्ट्रोलाइट्सची कमतरता असल्यास स्नायू



आखडतात. त्यामुळे वेदना जाणवतात. शरीरातील पोटॅशियम, कॅल्शियम आणि मॅग्नेशियम कमी झाल्यास पोटऱ्यांमध्ये कळ जाते. सतत उभं राहून काम करणाऱ्यांच्या पोटऱ्या फार थकतात. त्यामुळेही वेदना वाढतात. गरम पाण्याचा शेक घेणे हा सर्वोत्तम उपाय आहे. सायकलिंग करा. पोटऱ्या मजबूत होतात.

पोटऱ्याची अतिरिक्त चरबी कमी करण्यासाठी कार्डिओ व्यायाम करा. तसेच धावणे, चालणे, झुंबा, स्कॉट्स मारणे बैठका मारणे, असे व्यायाम करा. सायकल चालवा. पोटऱ्यांसाठी सगळ्यात मस्त व्यायाम म्हणजे सायकल चालवणे. पायाला तेलाने मालीश करायचे. त्यामुळे स्नायू मोकळे होतात.

# शेतजमिनीच्या वाटणीवरून होणारे वाद होणार कमी; नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाचा नवा निर्णय

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक**

राज्य सरकारने शेतजमिनीच्या वाटपपत्राच्या दस्तावर आकारण्यात येणारे नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतला आहे.मात्र, अशा दस्तांवर पूर्वीच्या अधिसूचनेनुसार किमान १०० रुपये मुद्रांक शुल्क आकारण्यात येणार आहे. यापूर्वी जमीन वाटपाचा मोठा हिस्सा वगळून अन्य भागांच्या किमतीच्या १ टक्का नोंदणी शुल्क आकारण्यात येत होते.अशा दस्तांची नोंदणी वैकल्पिक असल्याने तसेच नोंदणी शुल्क जास्त असल्याने दस्तनोंदणी कमी होत होती. या निर्णयामुळे यात वाढ होईल, अशी आशा नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाला आहे.

विदर्भ प्रजासत्ताक
कृषी
विशेष

राज्य सरकारने याबाबतची अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ८५ नुसार शेतजमिनीचे वाटप करताना मोजणी करून वाटपाच्या दस्तास मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क द्यावे लागत होते.यात एकूण हिश्श्यांमधील मोठा हिस्सा वगळून अन्य हिश्श्यांच्या किमतीची बेरीज करून त्यावर एक टक्का नोंदणी शुल्क आकारण्यात येत होते. त्यामुळे ही किंमत जास्त असल्याने अशा वाटपाच्या दस्तनोंदणीची संख्या तुलनेने कमी होती.

अनेक शेतकरी दस्तनोंदणी करणे टाळत होते. तरीदेखील राज्यात दरवर्षी २५ लाख दस्तांची नोंदणी केली जाते. त्यात अशा दस्तांची संख्या सुमारे एक ते दीड लाख इतकी असते. हे प्रमाण शहरी भागात कमी असून ग्रामीण भागात जास्त आहे.

**काय आहे निर्णय?**

नोंदणी न केल्यामुळे भविष्यात शेत जमिनीवर वाद निर्माण होऊन त्याचा शेतकऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना नाहक त्रास सहन करावा लागत असतो.

त्यामुळे अशा दस्तांना नोंदणी शुल्क माफ मंत्रिमंडळाच्या बैठकीत मागील महिन्यात घेतला होता.

त्यानुसार याबाबतची अधिसूचना राजपत्रात महसूल विभागाचे सहसचिव सत्यनारायण बजाज यांनी प्रसिद्ध केली आहे.




आता अशा दस्तांना नोंदणी शुल्क आकारण्यात येणार नाही.

मात्र, राज्य सरकारच्या पूर्वीच्या अधिसूचनेनुसार नोंदणी शुल्क माफ असले तरी किमान १०० रुपये मुद्रांक शुल्क आकारावे असे निर्देश दुय्यम निबंधकांना देण्यात आले आहेत.

त्यामुळे असे दस्त केवळ १०० रुपयांत केले जाणार आहेत.

शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# ७ हजार २०० रुपयांचे बियाणे जप्त, प्रतिबंधित कपाशी बियाण्याची विक्री करणाऱ्यास अटक

## घरातील गोठ्यात साठवून अवैध विक्री

**विदर्भ प्रजासत्ताकदि.३० चांदुर रेल्वे,** पेरणीचा हंगाम सुरू होताच शासनाने प्रतिबंधित केलेल्या कपाशीच्या बियाण्यांची विक्री करणाऱ्या-विरोधात चांदुर रेल्वे तालुका कृषी कार्यालयातील बियाणे निरिक्षक राजेंद्र दिनकरराव बांबल यांनी मोठी कारवाई केली आहे. मांजरखेड येथे कृषी विभाग व पोलिसांनी संयुक्त कारवाई करत एकूण ७ हजार २०० रुपयांचे बियाणे जप्त केले असून आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आरोपीवर चांदुर रेल्वे पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले

माहितीनुसार, मांजरखेड (कसबा) येथील अविनाश ज्ञानेश्वर आखरे या इसमाने आपल्या घरातील गोठ्यात शासनाने



प्रतिबंधित केलेली कपाशीची बियाण्याची पाकिटे विक्रीसाठी साठवून ठेवली होती. तसेच त्यांची अवैधरित्या विक्री करत असल्याची गुप्त माहिती कृषी अधिकाऱ्यांना


मिळाली होती. यानुसार २८ जून रोजी सकाळी ११ वाजता कृषी विभागाच्या पथकासह पोलिसांनी आरोपीच्या घरावर छापा टाकला. या वेळी आरोपीच्या ताब्यातून तिलक ५ जी रिसर्ज कॉटन सिंड या प्रकारचे ४५० ग्रॅम वजनाचे दोन सिलबंद पाकीट (किंमत १२०० रुपये) आणि अजित १५५ बीजी-५ प्रीमियम हायब्रीड कॉटन सीडची सहा पाकिटे असा एकूण ७,२०० रुपयांचा प्रतिबंधित बियाण्याचा साठा जप्त करण्यात आला. याप्रकरणी चांदूर रेल्वे पोलिसांनी आरोपी अविनाश आखरे विरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# वक्फचे लाड बंद करा ,वक्फ आणि मंदिरे या कारणे कायदे का ?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती-** 'वरा' कडे नोंदणी वक्लाफच्या हॉटेल अतिक्रमण . वर्ष २०८ मध्ये 'महाराष्ट्र राज्य ० ( उदकासन ) कायदा (महाराष्ट्र सरकारी परिसर (उदकासन) कायदा, १९६)' या आनंदात ५ मध्ये आली . मंदिरे आणि वक्फ हे दोन्ही धार्मिक स्थळे असूनही वक्फ बोर्डवर अतिक्रमण हटव सरकारी यंत्रणा दिली जाते ; मात्रं मंदिरासाठी विश्वस्तांसाठी अतिक्रमणाच्या पायरी झिजवा प्रयत्न . अशा प्रकारे मंदिरे मंदिरे आणि कायदा आहे . हे विधान सभा आहे . वक्ता लाभ दिला , त्याप्रमाणे जो लाभ दिला यावा अन्यथा मंदिराप्रमाणे बोर्डफाला देण्यात आला विशेष लाभ बंद करण्यात आला , असे पत्र हिंदू विधिज्ञ बोर्डाचे राष्ट्रीय अध्यक्ष अधिवक्ता वीरेंद्र इचलकरांजी यांनी महाराष्ट्र शासनाला लिहून आज्ञापालन केले आहे .

या पत्राला हिंदू विधिज्ञांकडून पुढील प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत ....

१ . सरकारी वास्तूंशीं जागांशी तक्रार नोंदवत रहात असेल , तर त्याला तिथून बाहेर काढण्यासाठी किंवा भाडे तत्सम खर्च वसूल करण्यासाठी वर्ष १ ९५६ महाराष्ट्रामध्ये 'शासकीय इमारती ( उकासन ) कायदा' व्यवस्था लागू करण्यात आला . याचा अर्थ केली . त्याच्यात वेळोवेळी बदल मानसिक आहेत .




२ . काँग्रेस कॉलमधील महत्त्वाचा बदल म्हणजे वर्ष २००८ मध्ये बॅकसचा नियम वक्फच्या लोकशाही कायदा असा असा , वक्फच्या एका व्यक्तीवर जर अतिक्रमण असेल , तर हटवा ते अति वक्फला कारण धावणे आवश्यक नाही तर राज्य उलटे हटवायचे आहे .

३ . तसेच वक्फला स्वत: : ची प्रोफाईल इतर कोणत्या कामाचा वापर करणार असेल , तर वक्फला दिवाणी धावांसाठी आवश्यक नाही . त्यांनी शासन व्यवस्था उभारणी केली आहे आणि त्या जिल्ह्यावर सरकारी यंत्रणा आहे आणि सदर जमीन / इमारत व मी तयार करून देते . वक्त काही थकले असेल , तर तेही जमीनऱ्याच्या वसुलीच्या वसुलीच्या वसुलीच्या शोधून काढल्याची अशी या लोकत गट आहे .

४ . सरकारी सरकारी आणि पुन्हा एकदा जी सुविधा लागू केली , त्यासाठी मात्र मंदिराला दिली नाही . धर्मादाय ची मंदिर तयार करण्यासाठी , सरकारकडे , आणि मंदिरे यांच्यासाठी असाफ नियम का ? वक्फप्रमाणे मंदिरांना लाभ मिळत नाही ? एकतर सदरात कलम २ मध्ये वक्फकलाच मंदिरांच्या समुदायामध्ये समावेश करण्यात आला आहे किंवा वक्फलामधून या वगळण्यात यावे , अशी हिंदू विधिज्ञ जनता केली आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. २९ जून २०२५

शहर/ग्रामिण


# जिल्ह्यातील ९३.३८२ शेतकरी नमो महासन्मान योजनेपासून वंचित

## आधार, लँड सिडिंग व ई केवायसीचे कारण

विदर्भ प्रजासत्ताक
दि.३० अमरावती

केंद्र व राज्य शासनाकडून शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देऊन सक्षम बनविण्याकरिता अनेक योजना काढण्यात आल्या. त्यापैकीच एक म्हणजे शेतकरी सन्मान व महासन्मान योजना आहे. सन २०२३ पासून ही योजना सुरु करण्यात आली असून दोन वर्षानंतरही ९३ हजार ३८२ शेतकरी दोन्ही योजनेपासून वंचित आहे. शेतकऱ्यांनी अर्ज केले मात्र पुढे त्यांनी रुची दर्शविली नाही तर दूसरीकडे अधिकाऱ्यांनी सुध्दा प्रोत्साहित केले नाही. परिणामतः आधार सिडिंग, लँड सिडिंग व ईकेवायसी अभावी शेतकरी लाभापासून वंचित आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या नावावर वार्षिक ६ हजार तर राज्याकडून नमो शेतकरी महासन्मान निधी वार्षिक ६ हजार आर्थिक मदद म्हणून शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येते. २०२३ मध्ये सुरू करण्यात आलेल्या या योजनेमध्ये जिल्ह्यातून तीन लाख ७० हजार २४ शेतकऱ्यांनी अर्ज केले. अल्प व मध्यमशेतकऱ्यांना या योजनेत लाभ देण्यात येतो. त्यापैकी दोन लाख ७६ हजार १८२ शेतकऱ्यांना



पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना व नमो शेतकरी महासंघाने योजनेचा लाभ दिला जात आहे. मात्र ८ हजार १८९ शेतकऱ्यांनी ई केवायसी केली नाही, तर ५ हजार १३१ शेतकऱ्यांचे आधार सिर्डीग झालेले नाही. तर लँड सिर्डीग न झाल्यामुळे २ हजार ७९० या योजनेचा लाभ घेऊ शकत नाही. तर अन्य शेतकऱ्यांनी या योजनेकरिता अर्ज केले मात्र ती प्रक्रिया पुढे केली नाही. एकीकडे शेतकऱ्यांनी या योजनेला प्रतिसाद दिला नाही तर दुसरीकडे अधिकाऱ्यांनी देखील या योजनेतील शेतकऱ्यांकडून ते करून घेतले नाही. परिणामी दोन वर्षानंतर ही ९३ हजार ३८२ शेतकरी वंचित आहे.-

# हवामान विभागाचा यलो अलर्ट

## दोन दिवस मुसळधार पाऊस, तापमान ५ डिग्रीने घसरले

विदर्भ प्रजासत्ताक
दि.३०अमरावती,



गेल्या दोन दिवसासून अमरावती व परिसराची रिपरिप सुरु आहे. मात्र आगामी काही दिवसात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. पुढील दोन दिवस मेघगर्जनेसह पाऊस पडू शकतो. हवामान विभागाने यलो अलर्ट (सतर्कतेचा इशारा) दिला आहे. दरम्यान अमरावतीचे तापमान पाच डिग्रीने घसरुन २७. २ झाले आहे.

पश्चिम विदर्भातील अकोला, यवतमाळ, वाशिम, बुलढाणायाजिल्ह्यात पावसानेचांगला जोर धरला आहे. अमरावती शहर व परिसरात मात्र अद्याप समाधानकारक पावूस झालेला नाही. त्यामुळे हवामान विभागाने वर्तवलेला अंदाज जिल्हयातील बळीराजाला सुखावणारा आहे. विदर्भात पुढील दोन दिवस मेघगर्जनेसह पाऊस पडू शकतो, असे हवामान विभागाने म्हटले आहे. यंदा १५ दिवस अगोदरच मोसमी पाऊस दाखल झाला आहे. मोसमी पाऊस सर्वसाधारण तारखेच्या आधीच महाराष्ट्रात दाखल झाला. अमरावतीतही मे महिन्याच्या अखेरीस पावसाने चांगलाच धुमाकूळ घातला. मात्र त्यानंतर अर्धाअधिक जून महिना कोरडा

गेला. जून महिन्याच्या शेवटी थोडाफार पावूस पडला. मागील एकदोन दिवसांपासून पावसाची रिपरिप सुरु आहे. दरम्यान एक जूनपासून राज्यात १० टक्के जास्त पाऊस झाला आहे. हवामान विभागाच्या अंदाजित वेळेनुसार, साधारणपणे ८ जुलै रोजी नैऋत्य मोसमी पाऊस संपूर्ण देश व्यापणार आहेत. सर्वदूर मोसमी पाऊस पडण्यास अनुकूल वातावरण असून, पुढील पाच दिवस सर्वत्र चांगला पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. दरम्यान पावसाने अकोला, वाशिम, यवतमाळ व बुलडाणा जिल्हयात चांगलाच धुमाकूळ घातला आहे.

# नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण, हरिसाल व तारूबांदा रेंजमध्ये वाघाचा मुक्त संचार



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० मेळघाट** – हरिसाल तथा तारूबांदा या गुगामल वन्यजीव विभागातील सध्या दहा गावांमध्ये वाघ आणि वाघिणीची प्रचंड दहशत पसरलेली आहे. चिखली फाटा ते रोरा पर्यंत अनेक प्रवाशांनी वाघला मोठया आरामाने इव्हिनिंग वॉक करतांना पाहिल्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यापासून धोका वाढलेला आहे. हरिसालच्या मन्नाचा जीव गेल्यानंतर सुध्दा व्याघ्र प्रकल्पाकडून गंभीरतेने उपाय-योजना केल्या गेल्या नाहीत.

हरिसाल ते चौराकुंड आणि हरिसाल ते रोराचिखली फाट्यापासून केसरपुर, भिरोंजाकेली पर्यंत पट्टेदार वाघाचामुक्त संचार सुरू असल्याने आदिवासी दहशतीत आहे. मात्र हरिसाल व तारूबांदाचे कर्मचारी मोठया आरामानेकागदोपत्री उपाय-योजना करित आहेत. जंगलात जागोजागी व्याघ्र संक्रमन सदर क्षेत्रात वाघाचे अस्तित्व आहे, जंगलात प्रवेश करू नये, असे लिहलेले फलक लावण्यात आले. हरिसाल व तारूबांदा येथे वन्य प्राण्यांपासून नागरिकांचे रक्षण करण्याची कोणतीच उपाय-योजना नाही. याशिवाय वन्य प्राण्यांना हाताळण्याचे प्रशिक्षण पण कर्मचाऱ्यांना नाही. हरिसाल ते चौराकुंड आणि हरिसाल ते रोरा पर्यंत रस्ता सध्याधोकादायक आहे. मानवासाठी व वाघासाठी सुध्दा धोका निर्माण होऊ शकतो. वाहतुक जास्त असल्याने अपघात पण नाकारता येत नाही. चिखली, रोरा, चौराकुंड, वनमालुर, चौपन, खोकमार व तांगडा जाण्यासाठी या एकाच रस्त्याचा उपयोग करणे सामान्य जनतेला भागत असल्याने कोणत्याहीवेळी मोठी घटना होऊ शकते.

हरिसाल व तारूबांदाच्या जंगलात वाघ, वाघिण

# विभागीय डॉ. श्वेता सिंह मुख्यमंत्री व उपमुख्य मंत्री पोलिसांकडून सत्कार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**–नागपूर येथील महा-स्ट्राईड कार्यशाळेत अमरावती विभागाच्या विभागीय डॉ. श्वेतांघल नागरिक ’हसूल अधिकारी व कर्मचारी सिंघल कर्मचारी यांच्यासाठी मुख्य कार्यप्रदर्शन निर्देशक (मुख्य कामगिरी निर्देशक) निश्चित करणे ’ या विषयावर उत्कृष्ट सादरीकरण सादर करणे राज्याचे मुख्यमंत्री अंतिम व उपमुख्यमंत्री एकनाथ विकास यांच्या सत्कार करण्यात आला.

नागपुरातील भारतीय व्यवस्थापनांद्वारे विभागीय, तसेच इतर विभागीय प्रमुख अधिकारी दोन दिवसीय बँक वित्तीय महास्ट्राँड खुलासा करण्यात आले. अमरावतीचे, आशिष येरेकर को राष्ट्रपती अजित कुंभार, यवतमाळचेभार आर्थिक विकास मीना, बुलडाण्याचे लोकशाही डॉ. किरण पाटील, वाशिमच्या झोनेश्वरी एस. सदस्य म्हणून सभासद उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या, विभागामार्फत विविध प्रशासकीय विभागांच्या संभाव्य क्षेत्रीय स्तरावरील विविध स्तरांवरील कार्यकारिणी, योजनांची परिणामकारकता, कार्यक्षमतेची प्रणालीचे मुल्यांकन, माहिती व्यवस्थापन, याचा सखोल अभ्यास कार्य सुधारित. व शिफारशी करण्याकरिता, सहा विभागीय विभाजकांच्या अध्यक्षतेखाली विषयवार समित्या गठीत करण्यात आले. विशिष्ट अमरावती विभागाच्या अधिकाऱ्यांकडे ’ विविध संवर्गातील कर्मचारी कर्मचाऱ्यांसाठी मुख्य कार्यप्रदर्शक निर्देशक (मुख्य कार्यप्रदर्शन निर्देशक) निश्चित करणे ’ हा अत्यंत महत्त्वपूर्ण विषय होता. अमरावतीच्या विजयला दिलेली उमेदवार पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री प्रेरणा लाभली. अपर मुख्य सचिव (महसूल) यांनी वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केले. नोंदणी महानिरीक्षक जमाबंदी नियंत्रण अधिकारी तसेच मौलिक अभिलेख यांच्या चर्चा करण्यात आली. या सर्वांचे अत्यंत महत्त्वाचे विचार महाराष्ट्राचे पुरोगामी प्रेरक भागे शासनाच्या अत्यंत महत्त्वपूर्ण अशा विभागाचे मुख्य कार्यप्रदर्शक निर्देशक तयार केले. यासाठी महिलाकन्या व उपसमिती अध्यक्ष सर्व सदस्यांनी अथ परिश्रम घेतले. खूप कमी होते (केपीआय अहवाल) हे कार्य पूर्ण केले, विभागीय विभाग डॉ. श्वेता सिंघल यांनी सत्काराला सांगितले.या प्रभागाने तयार केलेले मुख्य कार्य निर्देशक (मुख्य कार्यप्रदर्शन निर्देशक) आणि प्रत्येक कार्य विभागातील प्रत्येक अधिकारी असा कार्यक्षेत्रातील प्रत्येक अधिकारी असा कामा जोडणीला स्पष्ट करा आणि त्यांनी केलेल्या कामाच्या मुद्यावर विश्वास ठेवला तर विभागीय डॉ. सिंघल यांनी व्यक्त केला.

# शिवसेना ठाकरे गटाचे इर्विन चौकात आंदोलन

## हिंदी सक्तीच्या शासननिर्णयाची होळी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.३०अमरावती–

शिवसेना उबाठा पक्षचे शहर प्रमुख प्रवीण हरमकर यांच्या नेतृत्वात इर्विन चौकात महाराष्ट्रात हिदी शक्ती पहिल्या वर्गापासून विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या हिदी भाषेच्या विरोधात भारतीय जनता पार्टी यांचा जाहीर निषेध करण्यात आला. यावेळी शिवसेना शहर प्रमुख प्रवीणहरमकर मनोज कडू जिल्हाप्रमुख यांच्या नेतृत्वात राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयाचा जीआर जाळून निषेध करण्यात आला.या निषेध आंदोलनात उपस्थित प्रवीण हरमकर, सागर देशमुख, प्रदीप बाजड, गोविंद दायमा,, मनीष



रामावत, नितीन तारेकर, आनंद राठी, निकेश शर्मा, रुपेश आलेकर, शेखनसीम मोहम्मदरशीद, संदीप मानेकर, जुगल महाराज दवे, विनोदमंडळकर, चंद्रशेखर गिरी, प्रफुल भोजने, प्रमोद कोहडे, संजू थुले, नरेश वानखडे, दत्ता ढोमणे, गब्बर पठाण, संजय होले, मनोज कडू, प्रतिभा बोपशेट्टीवार, विकी गुहे शेख अजीम लाला, उमेश केडिया, कांचनताई ठाकूर, विजू ठाकरे, पंजाब तायवाडे नितीन हटवार, आशिष प्रमोद वानखडे, अशोका दिलीप काकडे, पार्थ हरमकर, तुषार अनासने, सुरेश चौधरी, ईश्वर खळेकार, दिलीप केणे, मनोज मोहरे, भास्कर सोनटक्के, नरेंद्र देऊळकर, नरेश वानखडे, बंडू यादव, विश्वजीत मेश्राम, तलिश पठाण, उमेश जयस्वाल, रणजीत दिवे, रमेश धावणकर, उमेश केडिया, कॉलिग नंदनवार, गजानन यादव, निलेश मुन्नाने, विनोद शेलोकार, दिलीप बाममोटे, निलेश ढोले, अजिंक्य पाटणे, अतुल सावरकर, नानाजी देऊळकर, दिलीप देवताळे आदी उपस्थित होते.

# अ.भा ग्राहक पंचायतच्या मिशन टॅग अ बॅग या उपक्रमाचे मनपा आयुक्तांनी केले कौतुक

**अखिल भारतीय ग्राहक पंचायत च्या शिष्टमंडळाने प्लास्टिक संकलनाबद्दल दिले निवेदन**

**विदर्भ प्रजासत्ताकदि.३० अमरावती–** अ.भा.ग्राहक पंचायतच्या विदर्भ प्रांत सचिव श्री चारुदत्त चौधरी,महिला प्रतिनिधी डॉ शोभा गायकवाड, अमरावती जिल्हा संघटक श्री अशोक हांडे, जिल्हा उपाध्यक्ष डॉ चंदणसिंह राजपूत, समाजसेविका सौ आशा नीचत या पदाधिकाऱ्यांनी अमरावती मनपाच्या नवनियुक्त आयुक्त सौम्याजी शर्मा यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचे पुषपगुच्छाने स्वागत करून शुभेच्छा दिल्या.त्यांच्या स्वच्छ अमरावती, सुंदर अमरावती या विषया वर अर्थपूर्ण चर्चा केली.पदाधिकाऱ्यांनी या बाबतीत सहाय्य करण्याचे आश्वासन दिले. अ.भा ग्रा.पंचायतच्या संपूर्ण विदर्भात सुरू असलेल्या मिशन टॅग अ बॅग या उपक्रमाची संकल्पना समजावून सांगितली. मिशन टॅग अ बॅग या उपक्रमाबद्दल आयुक्तांनी अ भा ग्राहक पंचायतच्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून या जनहिताय, राष्ट्रहितेशी उपक्रमाची वाखाणणी केली. शिष्टमंडळाने घराघरांतून



प्लास्टिक संकलनाचे व त्यांच्या पुनर्निर्माणाची जबाबदारी महानगर पालिकेने घ्यावी.अशी आग्रही मागणी केली.तसेच कापडी पिशव्या वापरण्यासाठी जनतेने पुढाकार घ्यावा.त्यासाठी जनतेचे उद्बोधन करणे आवश्यक आहे.हा मुद्दा सुद्धा चर्चेत आला.सौम्याजी शर्मा अतिशय सकारात्मक प्रतिसाद देताना म्हणाल्या,की यातील काही बाबींवर कार्यवाही सुरू आहे.लवकरच आणखी ठोस निर्णय घेतला जाईल.प्रांत सचिव श्री चारुदत्त चौधरी यांनी सांगितले की ग्राहक पंचायत चे पर्यावरण रक्षण कार्य सुद्धा मुख्यत्वे प्लास्टिक पिशव्या वर केंद्रित असून विविध गावात व शहरात प्लास्टिक पिशव्या घराबाहेर न फेकण्याचा संकल्प अनेकजण करीत आहेत.कापडी पिशव्यांच्या वापरामुळे रोजगार सुद्धा वाढीस लागेल.आयुक्तांनी या विधायक उपक्रमाची दखल घेतली. व अखिल भारतीय ग्राहक पंचायत चे आभार मानले.याप्रसंगी आयुक्तांना कापडी पिशवी व टॅग भेट देण्यात आला.

# ८ ते १७ सप्टेंबर राहणार यात्रेचा कालावधी इस्कॉनच्या वतीने द्वारका धाम यात्रा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.३०अमरावती

आंतरराष्ट्रीय कृष्ण भावनापूत संघ (इस्कॉन), श्री श्री रविमणी द्वारकाधीश आध्यात्मिक संस्कार केंड, राठी नगरच्या वतीने भाविकांसाठी विशेष अध्यात्मिक यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही यात्रा द्वारका धाम यात्रा या नावाने ८ ते १७ सप्टेंबर या कालावधीत घेण्यात येणार आहे. एकूण १० दिवसांच्या या यात्रेमध्ये गुजरॅट मधील पवित्र तीर्थक्षेत्रांना भेट देणार आहेत.या यात्रेची सुरुवात बडनेरा येथून ओखा एक्प्रेसने होणार असून, द्वारका, नागेश्वर, जांबवान गुंफा, पोरबंदर, माधवपूर, सोमनाथ, जुनागड, गिरनार, आनंद, डाकोर, केवाडिया आणि वडोदरा अशा अनेक प्राचीन आणि ऐतिहासिक स्थळांना भेट दिली जाणार आहे. यात्रेदरम्यान इस्कॉनच्या विविध केंद्रांमधील दर्शन, महात्म्य कथन, संकीर्तन व भक्तिमय वातावरणाचा भाविकांना अनुभव घेता येणार



आहे. भाविकांसाठी सोयी सुविधांचा समावेश असलेली ही यात्रा नाममात्र शुल्कात उपलब्ध करून देशात आली आहे. या शुल्कामध्ये एसी रेल्वे प्रवास, २ बाय २ एसी ट्रॅव्हल्स, आरामदायक एसी हॉटेलमधील निवास, दररोज बिस्लेरी पाणी, सात्विक व शुद्ध प्रसादम (नाश्ता, जेवण व रात्रीचे जेवण) यांचा समावेश आहे. तसेच प्रवासादरम्यान भेटवस्तूही देण्यात येणार आहे. प्रवासादरम्यान रेल्वेतही प्रसादाची व्यवस्था केली आहे. यात्रेतील काही स्थळांवरील रिक्षा, रोप वे, स्टॅच्यू ऑफ युनिटी इत्यादी प्रवेश तिकिटांचा खर्च प्रवाशांनी स्वतंत्रपणे करावयाचा आहे. या यात्रेसाठी नोंदणी करताना आधार कार्ड आणि फोटो आवश्यक आहे. तसेच ३० ऑगस्टला दुपारी २ वाजता यात्रापूर्व माहिती बैठक आयोजित केली आहे. यात्रेतील आसन संख्या मर्यादित असल्यामुळे इच्छुक भाविकांनी तत्काळ आपली नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. ही यात्रा भक्तांसाठी केवळ पर्यटन न राहता, एक आत्मिक शुद्धता आणि श्रीकृष्ण प्रेमाच्या अनुभूतीचे माध्यम ठरेल, असा विश्वास आयोजकांती व्यक्त केला

### महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या प्रयत्नांना यश

# आंतरजिल्हा बदलीने रुजू शिक्षकांचे पैसे एनपीएस खात्यात जमा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२९अमरावती**– आंतर जिल्हा बदलीने इतर जिल्ह्यामधून अमरावती जिल्हा परिषदेमध्ये रुजू झालेल्यांपैकी ३७ शिक्षकांचे इतर जिल्हा परिषदेत कपात झालेले एनपीएसचे पैसे अमरावती जिल्हा परिषदकडे वर्ग करण्यात आले होते. ते आता संबंधित शिक्षकांच्या एनपीएस खात्यात जमा झालेले आहेत.या हिशेबाच्या कपातीच्या पावत्या अमरावती जिल्हा परिषदेत जमा केल्यानंतरसुद्धा ते पैसे संबंधित शिक्षकांच्या एनपीएस अकाउंटवर जमा करण्यात आले नव्हते. याबाबत प्रेमसुखजी ठोंबरे (जिल्हा सरचिटणीस पेन्शन आघाडी) हे सतत पाठपुरावा करत होते. मुख्य कार्यकारी अधिकारी (जि. प. अमरावती) वशिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि. प. अमरावती यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये नुकतीच सर्व संघटनांची सभा डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात पार पडली. या सभेमध्ये महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने विषय उपस्थित करण्यात आला व संबंधित सर्व शिक्षकांचे दोन कोटी सत्तावीस लक्ष सहाशे चाळीस रुपये त्यांच्या एनपीएस खात्यावर जमा करण्यात यावे, अशी विनंती करण्यात आली.मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प. अमरावती यांनी ही रक्कम संबंधित शिक्षकांच्या एनपीएस खात्यावर जमा करण्याच्या सूचना दिल्या व त्यानुसार ही रक्कम आता संबंधित शिक्षकांच्या खात्यावर जमा झालेली आहे.-

# बियाणं गुजरातचं, धाडी महाराष्ट्रात मग, सुरू झालं माझं वावर - माझी पॉवर आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती-** राज्यात खरीप हंगामातील पेरण्या सुरू होऊन महिना उलटला आहे. या हंगामात प्रामुख्याने विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या घरावर पोलिसांनी धाडी मारण्याच्या घटना घडल्या. पोलिस थेट शेतकऱ्यांच्या दारावर का धडकले, असा प्रश्न निर्माण होणे सहाजिक आहे. देशात कापसाच्या एचटीबीटी बियाणांच्या लागवडीवर बंदी आहे. म्हणजे तणनाशक सहनशील बियाणांच्या लागवडीवर बंदी आहे.

अधिक सविस्तर सागायचं तर, कापसाची पेरणी झाल्यावर रानात जे तण उगवतं त्यावर तणनाशक औषधाची फवारणी केल्यावर तण मरते पण कापसावर काही परिणाम होत नाही, अशा तणनाशक सहनशील कापसाच्या लागवडीवर देशात बंदी आहे. पण, आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे तणनाशक सहनशील कापसाचे बियाणाचे उत्पादन केले जाते गुजरातमध्ये आणि त्या खालोखाल तेलंगाणात. बंदी असूनही देशात एचटीबीटी कापसाचे बियाणे विकसीत झाले आहे आणि त्याची लागवडही वाढली आहे.

अलिकडच्या अहवालानुसार या बंदी असलेल्या बियाणांची बाजारपेठ ६०० कोटींवर गेली आहे.

इतकी मोठी बाजारपेठ निर्माण होईपर्यंत कृषी प्रधान देशातील प्रशासन काय करीत होते. कुंभकर्णालाही लाजवेल, अशा झोपेत प्रशासन होते का ? शिवाय शेत मजुरांची टंचाई आणि वाढत्या मजुरीमुळे शेती पडीक पडू लागली आहे, अशा



काळात तणनाशक सहनशील बियाणांची गरज असतानाही त्याला का परवानगी दिली जात नाही, असा प्रश्न निर्माण होतो. शिवाय बियाणे निर्माण करणारी कंपनी नामोनिराळी राहते आणि त्या बियाणाचे पाकीट शेतकऱ्याच्या घरात आहे, या संशयावरून पोलिस धाडी टाकत आहेत, असा हा विचित्र प्रकार सुरू आहे.

राज्यात एचटीबीटी कापसाच्या बियाणाच्या लागवडीसाठी विदर्भ आणि मराठवाड्यात आंदोलन झाले. शेतकऱ्यांनी आंदोलन करून, सरकारचा निषेध करून लागवडी केल्या आहेत. शेतकरी संघटनेच्या वतीने खडकी (जि. यवतमाळ) येथे एचटीबीटी कापसाच्या लागवडीसाठी 'तंत्रज्ञान स्वातंत्र आंदोलन' झाले. अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यातील आडगावात दहा जून पासून माझं वावर - माझी पॉवर आंदोलन सुरू करून शेतकऱ्यांनी एचटीबीटी बियाणांची लागवड सुरू केली. पोलिसांनी अशी लागवड केली म्हणून शेकडो शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल केले आहेत.

गेल्या दहा वर्षांपासून विदर्भात कापूस उत्पादक शेतकरी या प्रतिबंधित बियाण्याची लागवड करीत आहेत. फक्त विदर्भातच साधारण १२५ लाख बियाण्यांच्या पाकिटाची (एक पॅकेट ४५० ग्रॅम बी) मागणी आहे. दरवर्षी साधारण २० टक्के क्षेत्र एचटीबीटीने व्यापले जाते. यावर्षी त्यात वाढ होऊन ४० टक्के क्षेत्र हे एचटीबीटी कापूस लागवडी खाली येण्याचा अंदाज बियाणे उद्योगातील जाणकार व्यक्त करीत आहेत. गेली आठ - दहा वर्षे सतत शेतकरी संघटनांचे नेते आंदोलन करूनही सरकार धोरणात्मक निर्णय घेताना दिसत नाही. एकीकडे कंपन्यांना संरक्षण आणि दुसरीकडे शेतकऱ्यांच्या घरावर धाडी टाकून गुन्हे दाखल करण्याचा हा उरफटा न्याय शेतकऱ्यांना मिळत आहे.

# गुरुकुंज मोझरीत शेतकरी-वारकरी महासंघाचे राष्ट्रीय अधिवेशन ८जुलैला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० अमरावती**

शेतकरी, वारकरी, कष्टकरी महासंघाचे राष्ट्रीय अधिवेशन ८ जुलै २०२५ रोजी, मंगळवारी, गुरुकुंज मोझरी येथील राष्ट्रसंत अध्यात्म केंद्र, दास टेकडी येथे दुपारी १२:३० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत होणार आहे. शेतकरी आणि शेतमजुरांचे हक्क, अधिकार आणि न्यायासाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांचे अवमूल्यन आणि मजुरांचे शोषण, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राजकीय भूमिका, स्वतंत्र कृषी न्यायालय आणि शेतकरी मंत्रालयाची स्थापना, शेतकरीविरोधी कायदे रद्द करणे, आणि शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना हे प्रमुख विषय असतील.

महासंघाने पाच वर्षांत महाराष्ट्रात एकही शेतकरी आत्महत्या होणार नाही अशी सडेतोड हमी दिली आहे. जागतिक बाजारपेठ मुक्त करून आयात-निर्यात धोरण शेतकरीहिताचे करण्याची मागणी आहे. शेतीशी संबंधित न्यायनिवाड्यासाठी स्वतंत्र कृषी न्यायालय आणि शेतकऱ्यांच्यालट बापू लट तुला लटलचं पाहिजे !

कल्याणासाठी स्वतंत्र शेतकरी मंत्रालयाची गरज अधोरेखित करण्यात आली. भारतात लेबर कोर्ट, फॅमिली कोर्ट, औद्योगिक कोर्ट असताना शेतीप्रश्नी दिवाणी न्यायालयांवर अवलंबून का राहावे, असा सवाल उपस्थित करण्यात आला.

या अधिवेशनात ग्रामगीता प्रचारकांचे शिबिर आणि ऑगस्ट २०२५ मध्ये पुढील अधिवेशनाची तयारी यावर चर्चा होईल. ना जात, ना पात, ना प्रांत, ना पक्ष, किसान बचाव एकच लक्ष हा नारा देत, सहभागी व्हा, स्वतंत्र व्हा! असे आवाहन करण्यात आले. अधिवेशनात किसान ब्रिगेड, क्रांती ज्योती ब्रिगेड, सीता मंदिर ट्रस्ट, संयुक्त रिपब्लिकन पार्टी, विदर्भकुरेशी समाज, श्री गुरुदेव सेवा संस्था, विदर्भ आंदोलन आघाडी, महाराष्ट्र जनजागृती मंच, छत्रपती शिवराय शेतकरी आघाडी, शेतकरी समन्वय समिती, आत्महत्याग्रस्त शेतकरी महिला आघाडी,




सरपंच संघटना, युवा ग्रामीण पत्रकार संघ, आदिवासी संघर्ष समिती यासह अनेक संघटना सहभागी होणार आहेत.

अॅड. वसंतराव ढोके, प्रकाश पोहरे, नंदेश अंबाडकर, बाळासाहेब देशमुख, सादिक कुरेशी, शिवराम पाटील, दिलीप गायकवाड, भगवान बोराडे, सुधाकर मोगल, विजयाताई वाढणकर, जोसनाताई कुरवाडे, डॉ. रमेश ढवळे, प्रीतीताई दीडमुठे यांच्यासह अनेक नेते उपस्थित राहतील. युवा आणि महिलांना प्राधान्य देणाऱ्या या बैठकीत विदर्भातून दिंडी यात्रेचे आयोजन आणि रणनीती आखण्यावर भर असेल. लेखक, कवी, पत्रकार, आंबेडकरी विचारवंत, वारकरी संप्रदाय आणि शेतकरी संघटना यांना सहभागी होण्याचे आवाहन आहे. अमरावतीतील हा लढा शेतकऱ्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्वातंत्र्यासाठी मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला, असे धनंजय काकडे यांनी कळविले आहे.

# दोन माजी आमदार भाजपमध्ये जाणार: कुणाल पाटील आणि अपूर्व हिरे यांचा होणार पक्षप्रवेश

## अधिवेशनापूर्वीच भाजपचा दणका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० नाशिक -** गेल्या काही दिवसांपासून महायुतीमध्ये जोरदार पक्षप्रवेश सुरू असल्याचे दिसत आहे. विशेषतः उत्तर महाराष्ट्र व नाशिकमधून ठाकरे गटाला चांगलाच धक्का देत भाजपमध्ये मोठ्या प्रमाणात इन्कमिंग सुरू झाले आहे. नाशिकमधून सुधाकर बडगुजर यांची शिवसेना ठाकरे गटातून हकालपट्टी करण्यात आली होती. त्यानंतर त्यांनी मोठे शक्तिप्रदर्शन करत भाजपमध्ये प्रवेश केला. आता उत्तर महाराष्ट्रातील दोन माजी आमदार भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत.

धुळे येथील माजी आमदार कुणाल पाटील आणि नाशिकचे माजी आमदार अपूर्व हिरे हे दोघेही भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. १ जुलै रोजी हे दोघेही पक्षप्रवेश करू शकतात. या दिवशी भाजपचे रविंद्र चव्हाण हे प्रदेशाध्यक्षपदी विराजमान होणार असल्याची देखील चर्चा आहे. तेव्हाच या दोन्ही माजी आमदारांचा पक्षप्रवेश सोहळा पार पडू शकतो.अपूर्व हिरे हे शिक्षक मतदार संघाचे आमदार होते. २०१९ च्या निवडणुकीत त्यांनी भाजपच्या विद्यमान



आमदार सीमा हिरे यांच्या विरोधात नाशिक पश्चिम मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. सीमा हिरे यांनी सुधाकर बडगुजर यांचा भाजपमधील पक्षप्रवेशावर नाराजी व्यक्त केली होती. परंतु आता अपूर्व हिरे यांचे पक्षप्रवेशाचे स्वागत केले आहे. सुधाकर बडगुजर यांचे अडचणी वाढवण्यासाठीच अपूर्व हिरे यांचा भाजपमध्ये प्रवेश घडवून आणल्याची चर्चा सध्या सुरू आहे.धुळे येथील काँग्रेसचे माजी आमदार कुणाल पाटील यांचा धुळे व त्या भागात चांगला प्रभाव आहे. त्यांच्या भाजपमध्ये प्रवेश केल्याने भाजपची चांगली ताकद वाढू शकते. कुणाल पाटील यांचा हा पक्षप्रवेश काँग्रेससाठी मोठा धक्का समजला जात आहे. कारण कुणाल पाटील हे राहुल गांधी यांचे निकटवर्तीय समजले जातात. मुंबई येथील भाजपच्या कार्यालयात हा पक्षप्रवेश होण्याची शक्यता आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण उपस्थित असल्याची माहिती समोर आली आहे. आजपासून पावसाळी अधिवेशन सुरू होणार, तत्पूर्वीच या दोन माजी आमदारांच्या पक्षप्रवेशाची माहिती समोर आली असून याचा भाजपला चांगलाच फायदा होऊ शकतो.

### माजी आमदार विजय भांबळे शरद पवारांची साथ सोडणार

शरद पवारांची साथ सोडून माजी आमदार विजय भांबळे उद्या अजित पवार यांच्या नेतृत्त्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत. त्यांनी यापूर्वी सेलू-जिंतूर विधानसभा मतदारसंघातून भाजपच्या आमदार मेघना बोर्डीकर यांच्याविरुद्ध निवडणूक लढवली होती. नवाब मलिक यांच्या पुढाकारामुळे भांबळे राष्ट्रवादीच्या वाटेवर असल्याचे सांगितले जात आहे. उद्या मुंबईतील महिला विकास महामंडळाच्या कार्यालयात त्यांच्या पक्षप्रवेशाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, यावेळी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार उपस्थित राहणार आहेत.

### नाशिकमध्ये ठाकरे गटाला धक्का

अलीकडेच ठाकरे गटाचे नाशिकमधील नेते सुधाकर बडगुजर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर विलास शिंदे यांनीही ठाकरे गटाचा राजीनामा देत भाजपची वाट धरली. या दोघांच्या जाण्यामुळे नाशिकमधील ठाकरे गटाची पकड कमजोर झाल्याचे चित्र आहे. त्यांच्यासोबत अनेक कार्यकर्ते व पदाधिकारीही भाजपमध्ये दाखल झाले आहेत. त्यामुळे आगामी नाशिक महापालिका निवडणुकीत ठाकरे गटाला याचा मोठा राजकीय फटका बसू शकतो. ही घडामोड भाजपसाठी लाभदायक ठरत असल्याचे बोलले जात आहे.

# विदर्भाचे नंदनवन चिखलदऱ्याकडे पर्यटक मोहित


## दाट धुक्यात हरवलं ओलेचिंब चिखलदरा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० अमरावती** विदर्भाचे नंदनवन मेळघाटातील सर्वांत सुंदर पर्यटन स्थळ असणारे चिखलदरा गत तीन दिवसांपासून धुक्यांमध्ये हरवले आहे. रिमझिम बरसणारा पाऊस आणि बोचरी थंडी असे आल्हाददायी वातावरण चिखलदऱ्याचे झाले आहे. या वातावरणाचा आनंद घेण्याची पर्वणी पर्यटकांना लाभली असूनचिखलदरा पर्यटन स्थळ हे सध्या पर्यटकांनी बहरले आहे. रविवारी पहाटे चिखलदरा शहरासह संपूर्ण सातपुडा पर्वतरांग ही धुक्यांमध्ये हरविली होती.शहरासह पर्वत रांगातून जाताना काही उंचीवरच धुक्यांच्या दाट चादरीमुळे काही अंतरावरचेही समोर काही दिसत नाही, अशी परिस्थिती आहे. जे पर्यटक पहिल्यांदाच अशा वातावरणात चिखलदऱ्याला येत आहेत त्यांच्यासाठीघाटातील प्रवासाचा हा अनुभव अतिशय थरारक असाच आहे.

प्रत्येक पॉईंटवर गर्दी

चिखलदरा येथे असणारे हरिकेन पॉईंट, भीम कुंड, स्कायवांक पॉईंट, गाविलगड किल्ला, देवी पॉईंट अशा सर्वच महत्त्वाच्या पॉईंट्सवर पर्यटकांची प्रचंड गर्दी उसळली आहे.विशेष म्हणजे पहाटे थोड्या फार अंतरावर असणारा माणूस देखील ओळखता येणार नाही इतके प्रचंड धुके चिखलदऱ्यावर पसरले होते. या धुक्यात फिरण्याचा आनंद अनेक पर्यटकांनी लुटला. या धुक्यांमुळेचिखलदरा येथे निर्माण होत असणाऱ्या देशातील सर्वांत मोठ्या स्कायवॉकचे पिल्लर देखील गुडूप झालेत. आता संपूर्ण पावसाळ्यावर चिखलदराचे वातावरण असेच अतिशय



बहरदार राहणार आहे.घाटवळणावरून डोंगराच्या उंच टोकावर वसलेल्या चिखलदरा येथे जाताना खोल दरींमधून वर मोठ्या प्रमाणात धुके उडताना दिसते. धुक्यात बुडालेल्या चिखलदरा येथे पर्यटकही पर्यटनाचा आनंद घेत आहे.

# महाराष्ट्रात काँग्रेसमध्ये वाद, वर्षा गायकवाड यांच्या विरोधात वरिष्ठ नेत्याचा मोठा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०मुंबई-** महाराष्ट्रात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. मात्र, निवडणुकीपूर्वीच मुंबई काँग्रेसमधील वाद खूप वाढला आहे. मुंबई काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी मुंबई काँग्रेस अध्यक्षा आणि खासदार वर्षा गायकवाड यांच्या विरोधात एकत्र आले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, येत्या बीएमसी निवडणुकीसाठी शनिवारी मुंबई काँग्रेसने एक समिती स्थापन केली. मुंबई काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांना या समितीत स्थान मिळाले नाही, त्यामुळे पक्षातील काही वरिष्ठ नेते नाराज झाले. नवीन निवडणूक समितीमध्ये खासदार चंद्रकांत हंडोरे, आमदार भाई जगताप, चरणसिंग सप्रा, नसीम खान आणि इतर अनेक नेत्यांना स्थान मिळाले नाही. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, निवडणूक समितीत स्थान न मिळाल्याने संतप्त झालेल्या वरिष्ठ काँग्रेस नेत्यांनी वर्षा गायकवाड यांच्याबद्दल एमपीसीसी प्रभारी रमेश चेन्निथला यांच्याकडे तक्रार केली आहे.दिल्ली हायकमांडलाही या नाराजीची



माहिती देण्यात आली आहे. वर्षा गायकवाड मनमानी पद्धतीने वागत असल्याचा आरोप ज्येष्ठ नेत्यांनी केला आहे. बीएमसी निवडणुकीसाठी स्थापन केलेल्या समितीत वर्षा गायकवाड यांनी त्यांच्या जवळच्या लोकांना स्थान दिले आहे. बहुतेक नेते अननुभवी आहेत. वर्षा गायकवाड यांना अध्यक्ष केल्यापासून मुंबई काँग्रेस जवळजवळ निष्क्रिय झाली आहे. कार्यकर्त्यांकडे कोणतेही कार्यक्रम नाहीत. एकेकाळी गर्दीने गजबजलेले मुंबई काँग्रेस कार्यालय आता ओसाड पडले आहे. वर्षा गायकवाड यांनी मुंबई काँग्रेसला फक्त धारावीपुरते मर्यादित केले आहे. दुसरीकडे, वर्षा गटाचे म्हणणे आहे की निवडणुकांसाठी आणखी अनेक समित्या स्थापन केल्या जातील, ज्यामध्ये इतर नेत्यांना स्थान मिळेल.आता जी समिती स्थापन करण्यात आली आहे ती मुंबई काँग्रेसची अंतर्गत समिती आहे, जी बीएमसी निवडणुकीदरम्यान प्रभाग रचनेसाठी सूचना किंवा आक्षेप नोंदवणे, पक्षाच्या प्रचाराची रूपरेषा ठरवणे यासह इतर मुद्द्यांवर काम करेल.

# येवदा येथे ग्रामीण रुग्णालय अखेर मंजूर

## प्रदीप वडतकर यांचा सलग पाच वर्ष संघर्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० दर्यापूर-** येवदा (ता. दर्यापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन अखेर पाच वर्षाच्या अविरत पाठपुराव्याने ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयात झाले आहे. याकरिता उबाठा गटाचे जिल्हा समन्वय प्रदीप वडतकर यांची संघर्षमय वाटचाल महत्त्वपूर्ण ठरली आहे. दर्यापूर तालुक्यातील सर्वात मोठे प्राथमिक आरोग्य केंद्र म्हणून येवदा या आरोग्य केंद्राचा समावेश होतो. या आरोग्य केंद्र अंतर्गत परिसरातील दहा ते बारा गावे जोडली गेली आहेत. लोकसंख्येच्या दृष्टीने तीस खाटांचे ग्रामीण रुग्णालय या ठिकाणी निर्माण व्हावे, याकरिता प्रथमच येवदा येथील ग्रामस्थ व सध्याचे उबाठा गटाचे जिल्हा समन्वय प्रदीप वडतकर यांनी १० जुलै २०१७ रोजी जिल्हा शल्य चिकित्सक यांना निवेदन सादर केले होते. तदनंतर सतत पाच वर्ष जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य उपसंचालक, आरोग्य सेवा सहसंचालक, आरोग्य विभागाचे अप्पर मुख्य सचिव, आरोग्य विभागाचे आयुक्त व आरोग्यमंत्री



यांचे स्तरावर अविरत पत्रव्यवहार व पाठपुरावा केला. अखेर २२ ऑगस्ट २०२३ रोजी शासनाने येवदानिधी व जागा हस्तांतरण होतात रुणांच्य सेवेत जागा हस्तांतराचा प्रस्ताव व निधी उपलब्ध व्हावा, यासाठी शासन स्तरावर प्रदीप वडतकर यांचा संघर्षाचा दुसरा टप्पा अद्यापही सुरू आहे. लवकरच जागा हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण होणार असून रुग्णालयाकरिता निधी देखील मंजूर होणार असल्याचा विश्वास उबाठाचे जिल्हा समन्वयक प्रदीप वडतकर यांनी व्यक्त केला.

### निधी व जागा हस्तांतरण होतात रुणांच्य सेवेत

जागा हस्तांतराचा प्रस्ताव व निधी उपलब्ध व्हावा, यासाठी शासन स्तरावर प्रदीप वडतकर यांचा संघर्षाचा दुसरा टप्पा अद्यापही सुरू आहे. लवकरच जागा हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण होणार असून रुग्णालयाकरिता निधी देखील मंजूर होणार असल्याचा विश्वास उबाठो जिल्हा समन्वयक प्रदीप वडतकर यांनी व्यक्त केला

# लोणार अभयारण्य राज्यात द्वितीय

## देशात दहाव्या स्थानी, 'उत्तम व्यवस्थापन' श्रेणित स्थान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०बुलढाणा**

जेमतेम २५ वर्षांपूर्वी घोषित झालेल्या जिल्ह्यातील ऐतिहासिक आणि जैवविविधतेने समृद्ध लोणार वन्यजीव अभयारण्याने राष्ट्रीय पातळीवर नावलौकिक मिळविला आहे. देशातील ४३८ राष्ट्रीय उद्याने आणि वन्यजीव अभयारण्यांमधून लोणारने दहावा, तर राज्यातून दुसरा क्रमांक पटकावला आहे.

केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या मूल्यांकनात लोणार अभयारण्यास ८८.२८ गुण मिळाले असून, त्याला 'उत्तम व्यवस्थापन' या सर्वोच्च श्रेणीत स्थान पटकावले आहे. २००० मध्ये लोणार अभयारण्याची घोषणा करण्यात आली होती. हे अभयारण्य ३६५ हेक्टरवर पसरलेले आहे.

जैवविविधतेने समृद्ध हे अभयारण्य बिबट, मोर, लांडगे, यांसह विविध प्रकारचे पक्षी, तसेच दुर्मिळ वनस्पती, औषधी वृक्ष याने समृद्ध आहे. बेसॉल्ट खडकांपासून बनलेले जगातील एकमेव खाऱ्या पाण्याचे सरोवर असून त्याला 'रामसर साइट'चा दर्जा आहे. लोणार सरोवर पर्यटनच नव्हे, तर संशोधन, पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे आहे.

२०२० ते २०२५ या कालावधीत देशभरातील विविध अभयारण्यांमध्ये उपलब्ध सुविधा, संरक्षणासाठीच्या उपाययोजना, विकासकामे आणि व्यवस्थापन यांचा अभ्यास करण्यात आला. यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन करण्यात आली होती. समितीच्या अध्यक्षस्थानी गुजरातचे सेवानिवृत्त प्रधान मुख्य संरक्षक डॉ. एच. एस. सिंग, तर सदस्य म्हणून डॉ. एस. के. सिंग, डॉ. बिभूती लाहकार आणि डॉ. सुतीर्था दत्ता यांचा समावेश होता.

# जिल्हापरिषदेचे १४ कृषी पुरस्कार जाहीर

## १ जुलैला गौरव : महिला शेतकऱ्यांचा कृषीदिनी होणार सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**




कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिला शेतकऱ्यांना जिल्हापरिषदेच्या कृषी विभागाकडून अहिल्यादेवी होडकर यांच्या २०० ब्या जयंतीचे औचित्य साधून यंदा १ जुलै या कृषिदिनी जिल्ह्यातील १४ प्रगतशीठ महिला शेतकऱ्याऱ्यांना 'आदर्श शेतकरी पुरस्काराने गौरविण्याचा निर्णय सीईओ तथा प्रशासक संजीता मोहपात्रा यांनी घेतला आहे. कृषी क्षेत्रात अत्लेखनीय कामगिरी केलेल्या ग्रामीण भागातील महिला शेतकऱ्यांना मान्यवरांव्याहस्ते पुरस्कार प्रदान केले जाणार आहे.जिल्हापरिषदेच्या वतीने दरवर्षी शेती क्षेत्रात वांगले काम करणाऱ्या शेतकऱ्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. कृषी विभागाच्यावतीने हे पुरस्कार दिले जातात. कृषी विभागाच्यावतीने सेंद्रिय शेती, फुले, फळे आणि दुग्ध क्षेत्रात तसेच शेती क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या १४ शेतकऱ्यांना पुरस्कार जाहीर झाले आहेत.१ जुलै रोजी झेडपीच्या डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात पुरस्काराचे वितरण होणार आहे. यावेळी सीईओ संजीता मोहपात्रा, एसीईओ प्रीती देशमुख, जिल्हा कृषी विकास अधिकारी मल्लपा तोडकर, कृषी अधीक्षक अधिकारी राहुल सातपुते आदी उपस्थित राहणार आहेत.

**हे आहेत पुरस्कारार्थी**

रजनी रावतकर (खडवाडी चांदूरबाजार) शांता धांडे (चुर्णी-चिखलदरा, कविता डोंगरे (आमला विश्वेश्वर-चांदूररेल्वे) रेखा पिसाट (जवर्डी- अंजनगाव सुर्जी), मोनिका दगडकर (हिरपूर) शीतल शिंदे (पुसदा-अमरावती), जयश्री खवले ( शिवणगाव-तिवसा), मंदा मेहरे नारायणपूर-अचलपूर), रेखा शेंद्रे (विर्शी-भातकुली), माधुरी काकडे (कोदोरी-नादगाव खंडेश्वर) जयश्री टोळे (पनीरा-दर्यापूर), रामगोपालन मावस्कर (टिटवा धारणी), लता पोहेकरा निभी- मोर्शी, माया यावलकर (वरुड)

# चांदूरबाजार एसटी डेपोतून महिलेच्या पर्समधून दागिने लंपास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०बेलोरा :**

चांदूरबाजार एसटी डेपोतून महिलेच्या पर्समधून अज्ञात चोरट्याने अंदाजे ६ लाख ७४ हजार रूपयाचे दागिने चोरून नेल्याची घटना २५ जून रोजी घडली.

सौ. सारिका संजय लांडे (२९) रा. मोझरी तिवसा असे फिर्यादी महिलेचे नाव आहे. ही महिला काही कामानिमित्त करजगाव येथे गेली होती. २५ जून रोजी ती परत गावी जाण्याकरिता चांदूरबाजार एसटी डेपोमध्ये एसटीची वाट पाहत उभी होती. दुपारी २ वाजताच्या सुमारास एसटीमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने पर्समधील सोन्याचे दागिने त्यामध्ये ४० ग्रॅम सोन्याची पोथ, २० ग्रॅम गोफ, २५ ग्रॅम दुसरी गोफ, कानातले लटकन ५ ग्रॅम, सोन्याची अंगठी पाच ग्रॅम असा एकूण ६ लाख ७४ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. हा प्रकार ती घरी गेल्यानंतर दुसऱ्या दिवशी लक्षात आला. तेव्हा तिने चांदूरबाजार पोलिसस्टेशन गाठून तक्रार दाखल केली. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला; परंतु चांदूरबाजार आगारात सीसीटीव्ही कॅमेरे नसल्यामुळे चोराला पकडण्यात पोलिसांना मदत होत नाही. या आगारात आठवड्यातून दोन-तीन चोरीच्या घटना होतात; परंतु तपास मात्र लागत नाही.

# वाठोडा शुक्लेश्वर मंदिरातील दानपेट्या फोडून रक्कम पळवली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०वाठोडा शुक्लेश्वर**

वाठोडा शुक्लेश्वर खोलापूर पोलिसस्टेशन अंतर्गत येणाऱ्या वाठोडा शुक्लेश्वर येथील शुक्लेश्वर देवस्थानमध्ये मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश करून अज्ञात चोरट्याने दानपेटी फोडून आतील रोकड चोरून नेल्याची घटना शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली.



शनिवारी उशिरारात्री अज्ञात चोरट्यांनी शुक्लेश्वर मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश करून दानपेटी फोडून रक्कम चोरून नेली. या घटनेची तक्रार सुशांत बेलोकार यांनी खोलापुरी पोलिसांत दाखल केली असता पोलिसांनी घटनास्थळी येऊन निरीक्षण केले, तसेच श्वान पथकाच्या मदतीनेसुध्दा तपास करण्यात आला, तसेच फोडलेल्या दानपेटीवरील चोरट्यांच्या हाताख्या ठशांचे निशाणसुध्या घेतले. पोलिसांनी मंदिरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता त्यामध्ये दोन चोरटे तोंडाला बांधून चोरी करतानादिसून आले. बेलीकार यांच्या तक्रारीवरून पोलिसानी या चोरी प्रकरणाचा पुढील तपास सुरू केला आहे.


# केंद्रप्रमुखांच्या भेटीत शाळेच्या भोंगळ कारभाराचा पर्दाफाश

## केंद्रामुख, सरपंच यांच्या दौऱ्यात मुख्याध्यापक, शिक्षक गैरहजर : माजी जि. प. सदस्य नितीन हटवार यांची कारवाईची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नांदगाव पेठ**

येथील जिल्हापरिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या भोंगळपणा नुकत्याच झालेल्या अचानक भेटीत उघडकीस आला आहे. केंद्रप्रमुख, सरपंच तसेच माजी जिल्हापरिषद सदस्य यांच्या संयुक्त भेटीत शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या अनुपस्थितीमुळे शिक्षणाचा सुरु अत्तलेला खेळखंडोबा समोर आला आहे

सकाळी ११ वाजता शाळा सुरु होण्याची वेळ असतानाही साडेदहा वाजेपर्यंत एकही शिक्षक शाळेत उपस्थित नव्हता. मुख्याध्यापक देवेंद्र ठाकरे हेदेखील दहा वाजून चाळीस मिनिटांनी शाळेत आले. उर्वरित शिक्षक मात्र घेट ११ वाजता शाळेत पोहोचले. विशेष म्हणजे मुख्याध्यापक यांच्या हजेरी रजिस्टरवरील मागील तीन दिवसांच्या सह्याही केल्या नव्हत्या, हे विशेष. ११ वाजता तात सुरु होण्याची वेळ असताना शिक्षक चक्क ११ वाजता शाळेच्या प्रांगणात पोहचत आहे. ही बाब शिक्षण



विभागाची लक्तरे वेशीवर टांगणारी आहे. शाळेचे रात्र सुरू झाल्यापासून शाळेत नवनवीन उपक्रमांची सुरुवात झाली आहे. मात्र या शाळेत कोणत्याही प्रकारचे उपक्रम राबविण्यात आले.एक पैठ माँ के नाम' या उपक्रमांतर्गत शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करणे गरजेचे असताना कुठेही हा उपक्रम राबविण्यात आला नसल्याचे दिसून आले, तर प्रत्येक लेखाचे मैदान आखण्याचे शासनाचे निर्देशदेखील मुख्याध्यापकानी पायदळी तुडविल्याचा आरोप यावेळी उपस्थितांनी केला. या भेटीत केंद्र प्रमुख पटेलसह सरपंचा कविता होने, माजी जिल्हापरिषद सदस्य नितीन हटवार, पालक प्रतिनिधी मनोज मोरे आणि अरुण राऊत हे उपस्थित होते. त्यांनी शाळेतील शिस्त आणि शिक्षकांच्या अनागोंदी कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली. या प्रकारामुळे शाळेतील शैक्षणिक वातावरणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधित शिक्षकांवर कारवाईची मागणी यावेळी नितीन हटवार यांनी केली आहे.

# फडणवीस मंचावर असताना सरन्यायाधीश गवईकडून उद्धव ठाकरेंचे भरभरून कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०नागपूर**

उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांचे नाते हे महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक चढ-उतारांनी भरलेले आहे. उद्धव ठाकरे आणि फडणवीस यांच्यात शाब्दिक संघर्ष सातत्याने सुरू असतो. नागपूर मध्ये अलीकडे झालेल्या एका कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस उपस्थित होते. यावेळी देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई देखील उपस्थित होते. न्या. गवई यांनी फडणवीस मंचावर उपस्थित असताना माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे भरभरून कौतुक केले.

नागपूर मध्ये एका झालेल्या कार्यक्रमात सरन्यायाधीश यांनी एकदा नव्हे तर किमान तीन चार वेळा उद्धव ठाकरे यांचे नाव घेतले



आणि कौतुक केले. न्या. गवई यांनी नागपूर मध्ये स्थापित करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधी विद्यापीठाच्या निर्मितीबाबत गोष्ट सांगितली. या विधी विद्यापीठाचे २०१६ साली भूमिपूजन झाले तेव्हा देवेंद फडणवीस मुख्यमंत्री होते. त्यांचा कार्यकाळात विद्यापीठाला भरपूर निधी दिला गेला. मात्र नंतर २०१९ मध्ये त्यांच्याकडे विरोधी पक्ष नेतेपद आले. या वेळी उद्धव ठाकरे यांच्याकडे मुख्यमंत्री पदाचा कारभार होता.

करोना काळात देखील उद्धव ठाकरे यांनी विद्यापीठाला निधीची कमतरता होऊ दिली नाही, अशा शब्दात न्या. गवई यांनी ठाकरे यांचे कौतुक केले. न्या. गवई यांनी फडणवीस यांच्या मुख्यमंत्री पदावर देखील गमतीशीर भाष्य केले. विधी विद्यापीठाचे भूमिपूजन झाले तेव्हा फडणवीस मुख्यमंत्री होते, दुसऱ्या वेळी ते विरोधी पक्ष नेता होते, त्यानंतर तिसऱ्या वेळी ते उपमुख्यमंत्री म्हणून विद्यापीठ कार्यक्रमात उपस्थित राहिले, आता पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले असता फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री म्हणून कार्यक्रमात उपस्थित आहेत, असे न्या. गवई म्हणाले.

# ५ जुलैला मराठा सेवा संघ केंद्रीय कार्यकारिणीची निवड समिती बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

मराठा सेवा संघ केंद्रीय कार्यकारिणीची (विदर्भ विभाग) ची बैठक ५ जुलै २०२५ शनिवार रोजी सायं. ६ वाजता स्मृतीशेष सचिन चौधरी सभागृह जिजाऊ प्रतिष्ठाण, मराठा नगरी, रहाटगांव नागपूर रोड, अमरावती येथे आयोजित करण्यात आली आहे. निवड समिती प्रमुख शिवश्री अरविंद गावंडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडणार आहे.मराठा सेवा संघ व ३३ कक्षा मध्ये जिल्हा कार्यकारिणी, विभागीय कार्यकारिणी तसेच राज्य कार्यकारिणीवर काम करण्यास इच्छुकांनी आपले अर्ज निवड समितीकडे सादर करावेत. यापूर्वी मे महिन्यात अर्ज दिलेल्या बांधवांनीसुद्धा नवीन विहित नमुन्यात अर्ज भरून द्यायचे आहेत. या निवड समितीमध्ये सदस्य म्हणून शिवमती सिमाताई बोके, दिगंबर जगताप, शिवश्री अशोक सुनिताताई महाले, जिचकार, व्ही.टी. शिंदे, ज्योतीताई कोथळकर, शिवाजीराव डोकर पाटील, वसंतराव देशमुख हे काम पाहतील.सदरील निवड समितीच्या बैठकीस अमरावती जिल्ह्यातील सर्व कक्षाचे आजी-माजी पदाधिकारी व आपापल्या इच्छेनुसार मराठा सेवा संघाच्या ३३ कक्षांमध्ये काम करण्यासाठी इच्छुक असलेलेतरुण मंडळी, महिला भगिनी व समाजबांधव यांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन मराठा सेवा संघ अमरावती जिल्हाध्यक्ष सुरेंद्र आडे यांनी केले आहे, तसेच फॉर्म बैठकीच्या ठिकाणीच देण्यात येतील व तिथेच भरुन घेण्यात येईल.

# शेगाव रहाटगाव रत्याचे काम......आठ दिवसात काम सुरु न झाल्यास रोडवर पडलेले संपूर्ण साहित्य कार्यालयात आणून फेकणार; प्रहार चा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

शेगाव रहाटगाव रस्ता अत्यंत वरदळीचा व अमरावती जिल्ह्यातील असंख्य तालुक्यांना जोडणारा मुख्य रस्ता असून या रस्त्यावर १२ ते १३ मंगल कार्यालय असून लग्न प्रसंगाच्या वेळी सर्वसामान्यांना सर्वसामान्यपणे जाण्या येण्यास अत्यंत त्रास सहन करावा लागत आहे. याची माहिती वारंवार आपणास दिलेली असताना सुद्धा आपण त्याची कुठलीही तसदी अथवा दखल घेत असल्याची दिसत नाही.त्यामुळे येत्या आठ दिवसात काम सुरु न झाल्यास रोडवर पडलेले संपूर्ण साहित्य कार्यालयात आणून फेकणार असल्याचा इशारा प्रहारचेसंपर्क प्रमुख चंदू खेडकर यांनी सार्वजनिक विभागाला दिला आहे.तसं स्मरण पत्र आज पुन्हा देण्यात आलं.शेगाव रहाटगाव रस्ताच्या एका बाजुने रोड



झालेला असून दुसरी बाजूने जाणे अत्यंत कठीण झाले आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे रस्त्याच्या कडेला असलेल्या बऱ्याच दुकानांमध्ये पाणी जाण्याची शक्यता आहे अशी स्थिती आहे. तसेच परिसरातील लोकांना जाणे येणे अत्यंत कठीण झालेले आहे. एकीकडून रस्ता झालेला असून त्यातल्या निघालेल्या लोखंडाच्या सळी या लोकांना जीव घेण्या झालेल्या आहेत असंख्य अपघात झाले कोणाच्या हात मोडले, कोणाचे पाय मोडले, याची माहिती आपल्या कार्यालयास वारंवार दिली. मात्र आपण कुठलीही काळजी घेतली नाही.

सदर रस्ताचे काम आठ दिवसात चालू न झाल्यास रोडवर पडलेले सर्व साहित्य आपल्या कार्यालयात आणून कार्यालयात मुक्कामी आंदोलन केले जाईल.असा इशारा प्रहार च्या वतीने देण्यात आला.

# स्मार्ट प्रीपेड मीटरविरोधात आंदोलन पेटले

## नागपूरात विदर्भ राज्य आघाडीकडून निदर्शने

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नागपूर**

तत्कालीन उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा निवडणूकीपूर्वी राज्यातील घरगुतीसह सामान्य ग्राहकांकडे स्मार्ट प्रीपेड मीटर लावणार नसल्याची घोषणा केली होती. परंतु मुख्यमंत्री पदाची सूत्रे स्विकारल्यावर मात्र जबरन ग्राहकांकडे स्मार्ट मीटरचे नाव टीओडी मीटर करून सक्तीने लावले जात आहे. हे मीटर लावल्यास उग्र आंदोलनाचा इशारा देत संतप्त विदर्भ राज्य आंदोलन समितीने सोमवारी व्हेरायटी चौकात जोरदार निदर्शने केली. यावेळी मीटरचे पोस्टर जाळण्यात आले.

आंदोलकांनी सांगितले की, अदानी, मोंटोकार्लोसह इतरही खासगी उद्योजकांचे खिसे भरण्यासाठी सरकार जबरन ग्राहकांकडे हे महागडे मीटर बसवत आहे. हे मीटर खूप जास्त दराने खासगी कंपनीकडून लावण्याचे करार केले गेले असून त्याच्या बदल्यास सत्ताधाऱ्यांना विविध पद्धतीने लाभ मिळण्याची शक्यताही आंदोलकांनी वर्तवली.

# महाबोधी विहाराबाबत सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय
# व्यवस्थापन बौद्धांकडे देण्यास नकार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०नागपूर**

गौतम बुद्धांनी जिथे ज्ञानप्राप्ती केली, त्या बोधगया (बिहार) येथील महाबोधी महाविहार मंदिराचे संपूर्ण व्यवस्थापन केवळ बौद्ध धर्मीयांकडे सोपवावे, या मागणीबाबत सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी स्पष्ट नकार दिला. सुलेखा कुंभारे यांनी दाखल केलेल्या याचिकेत १९४९ मधील 'बोधगया मंदिर अधिनियम' घटनाबाह्य असल्याचा दावा केला होता. सध्या या कायद्याअंतर्गत मंदिराचे व्यवस्थापन ९ सदस्यीय समितीकडे आहे.



यामध्ये ४ बौद्ध, ४ हिंदू आणि जिल्हाधिकारी (अध्यक्ष) यांचा समावेश आहे. परंतु बौद्ध समाजाचा आक्षेप आहे की, जिल्हाधिकारी बहुतेकवेळा हिंदूच असतो, त्यामुळे निर्णय प्रक्रियेत बौद्धांचे संख्यात्मक व प्रभावी प्रतिनिधित्व होत नाही. बौद्ध धर्मीयांचा आग्रह आहे की जगातील सर्वात पवित्र बौद्ध तीर्थस्थानाचे संपूर्ण नियंत्रण त्यांच्या हक्कात असावे. त्यांचे म्हणणे आहे की, अनुच्छेद २५ (धर्मस्वातंत्र्य), २६ (धार्मिक संस्थांचे व्यवस्थापन) आणि २९ (सांस्कृतिक हक्क) यांच्या अंतर्गत त्यांना हे अधिकार मिळाले पाहिजेत.

महाबोधी मंदिर हे युनेस्कोने जागतिक वारसास्थळ म्हणून घोषित केले आहे. इ.स. पूर्व ५ व्या शतकात गौतम बुद्धांनी याच स्थळी बोधी वृक्षाखाली ध्यान करताना ज्ञानप्राप्ती केली होती. त्यानंतर या स्थळाचा बौद्ध धर्माच्या केंद्रबिंदू म्हणून विकास झाला. अनेक शतकांनी सम्राट अशोकाने येथे पहिल्या वास्तू उभारल्या. पुढे भारतात बौद्ध धर्माचा प्रभाव कमी झाल्यानंतर मंदिरावर हिंदू ब्राह्मण पुजाऱ्यांचे वर्चस्व निर्माण झाले.

१९४९ साली स्वतंत्र भारतात बौद्ध समाजाने महाबोधी मंदिर पुन्हा मिळवण्यासाठी आंदोलन सुरू केले. त्याचा परिणाम म्हणून 'बोधगया मंदिर कायदा' पारित झाला, ज्यात काही प्रमाणात बौद्धांचा समावेश करण्यात आला. परंतु आजही मंदिरात मुख्य पुजारी हिंदू ब्राह्मण असतो, आणि महत्त्वाचे निर्णय जिल्हाधिकाऱ्याच्या अध्यक्षते खालील समितीतूनच घेतले जातात. यामुळे हे केवळ बौद्ध मंदिर नसून संयुक्त व्यवस्थापनाचे ठिकाण आहे असा शासकीय दृष्टिकोन बनलेला आहे.

# अमरावती जिल्ह्यात बोगस बियानांचा सुळसुळाट
## युवा स्वाभिमान पक्षाच्या कार्यकर्त्यांनी कृषी अधिक्षकांच्या टेबलवर फेकले बोगस बियाणे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

अमरावती जिल्ह्यात दीड महिन्यात प्रतिबंधित एचटीबीटीच्या ११ बोगस बियाण्यांच्या कारवाई कररण्यात आल्या.. मात्र तरी देखील अजित १५५, ५ऋ, ऋ९,एचटीबिटी या बोगस कपाशी बियाणांचा सुळसुळाट सुरू आहे त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक होत आहे, त्यामुळे आज आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाच्या वतीने जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयात आंदोलन करण्यात आलं,





युवा सन्मान पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक होत थेट कृषी अधीक्षक राहुल सातपुते, व सहाय्यक कृषी अधिकारी यांच्या टेबलवर बोगस कपाशीचे बियाणे फेकत त्यांचा निषेध केला.. प्रतिबंधित बोगस बियाणे यावर कारवाई अमरावती जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयाकडून करण्यात येत नाही असा आरोप यावेळी करण्यात आला,कींलीं बियाण्या सोबतच शेतकऱ्याना कपाशीचे डुप्लिकेट बियाणे शेतकऱ्यांना विकल्याचा आरोप करत अनेक ठिकानी बियाणे उगवले नसल्याचा शेतकऱ्यांनी आरोप केला आहे,तर जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयाने कारवाई न केल्यास बापना कंपनीचे दोन ट्रक बोगस बियाणे गुरुवारी विधानभवनाच्या गेट वर टाकू असा इशारा युवा स्वाभिमान पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष धीरज केने यांनी दिला.

# उद्धव ठाकरेंचे बेगडी मराठी प्रेम, खासदार राणेंची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०मुंबई**

मुख्यमंत्री असताना हिंदी सक्तीचा जीआर काढणारे उद्धव ठाकरे आता झोपेचं सोंग घेत आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. पाठोपाठ खासदार नारायण राणे यांनीही उद्धव ठाकरेंवर सडकून टीका केली आहे. उद्धव ठाकरेंचे मराठी प्रेम बेगडी आहे. राजकीय स्वार्थासाठी उद्धव 'मराठी प्रेम' दाखवत आहेत. मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरेंचे मराठी प्रेम कुठे गेले होते ? मराठी माणसाच्या नोकरी, व्यवसायासाठी, पोटाच्या प्रश्नासाठी उद्धव ठाकरेंनी काय केले ? मराठीच्या नावावर फक्त स्वतःचे कल्याण करुन घेतले. मराठी माणसाच्या आणि मराठी भाषिकांच्या कल्याणाचे काय ? असा प्रश्न खासदार नारायण राणे यांनी उपस्थित केला आहे.



महाराष्ट्राची राजधानी असूनही मुंबईत मराठी माणसाची टक्केवारी १८ पर्यंत खाली घसरली आहे. याला जबाबदार कोण ? असाही प्रश्न खासदार नारायण राणे यांनी उपस्थित केला आहे. मागील दोन दशकांपेक्ष जास्त काळापासून मुंबई महापालिकेत ठाकरेंची सत्ता आहे. पण याच काळात मुंबईतून मराठी माणूस हळू हळू हद्दपार होऊ लागला. उद्धव ठाकरेंना मराठी माणसांविषयी प्रेम आहे असे ते म्हणतात. पण उद्धव ठाकरेंची मुलं इंग्रजी माध्यमाच्या शाळेत का शिकली ? असा प्रश्न खासदार नारायण राणे यांनी उपस्थित केला आहे.सरकारने दोन जीआर रद्द केले म्हणून विजयी मेळावा काढणे म्हणजे नाचता येईना अंगण वाकडे असेच म्हणावे लागेल, या शब्दात खासदार नारायण राणे यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली.

# मोर्शीतील मायक्रो फायनान्स कर्मचाऱ्याला लुटणारी टोळी जेरबंद
## १२ लाखांची रोख रक्कम लुटल्याप्रकरणी सात आरोपी अटकेत; ५.६० लाखांचा मुद्देमाल जप्त

**विदर्भ प्रजसत्ताक दि.३०अमरावती**

मोर्शी येथील मायक्रो फायनान्स कंपनीचे व्यवस्थापक शुभम मस्के यांच्याकडून तब्बल १२.३९ लाख रुपये लुटणाऱ्या टोळीचा छडा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने लावला असून सात आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून ५.६० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.



### अशी घडली घटना

दि. २५ जून २०२५ रोजी शुभम मस्के व त्यांचे सहकारी शालीकराम धीकार हे फायनान्सच्या वसुलीतील रक्कम डइख बँकेत भरण्यासाठी जात असताना शिवाजी हायस्कूलजवळ तिघांनी त्यांच्या दुचाकीला कट मारून मस्के यांच्याकडील रोख १२.३९ लाखांची रक्कम असलेली बॅग हिसकावली आणि पसार झाले.

### अटक आरोपी

१. शेख समीर उर्फ सोनू शेख शफी वय २२ वर्ष, २. शेख साहिल उर्फ मोनु शेख शफी वय २४, ३. यश उर्फ आरू रवींद्र टेकाडे वय २३ वर्ष, ४. विशाल उर्फ वंश राजेश खत्री वय २१ वर्ष , वरील सर्व राहणार नरखेड , ५. तौसीफ खा शरीफ खा पठाण वय २२ (रा. येरला, मोर्शी), ६. तनीश उर्फ गोटया धनंजय पेंदाम, वय २१ (रा. नागपूर), ७. वि.सं.ग.प्र. बालक (रा. धरमपेठ, नागपूर)

### लुटीचा मास्टरमाइंड

शेख समीर उर्फ सोनू शेख हा या फायनान्स कंपनीत पूर्वी काम करत होता. त्याने आताच्या कर्मचाऱ्यांकडून माहिती मिळवून लुटीची आखणी केली होती. आरोपींनी दोन वाहनांतून घटनास्थळी जाऊन रक्कम हिसकावली व नागपूरमध्ये वाटप केले.

### जप्त मुद्देमाल

रोख रक्कम – १,००,०००, होंडा सिटी कार – ३,००,०००, पल्सर २२० (विनाकागदपत्र) – १,००,०००, ४ अँड्रॉइड मोबाईल – ६०,०००, एकूण किंमत: ५.६० लाख

### कारवाईत सहभागी अधिकारी

पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि किरण वानखडे, सपोनि सचिन पवार, सागर हटवार, नितीन इंगोले व इतर २० हून अधिक पोलिसांचे पथक कार्यरत होते.सर्व आरोपींना पुढील तपासासाठी मोर्शी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# पावसाळी अधिवेशनाच्या कामकाजाकरिता तालिका सभाअध्यक्ष म्हणून आ.सौ. सुलभाताई खोडके यांच्या नावाची घोषणा
## विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर यांच्या अनुपस्थितीत सांभाळणार पावसाळी अधिवेशनाचे कामकाज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०मुंबई**

राज्यविधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशन २०२५ ला आज सोमवार दिनांक ३० जुनपासून मुंबई येथे सुरुवात झाली आहे. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनासाठी विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांनी विधानसभेच्या तालिका सभाअध्यक्ष म्हणून जेष्ठ विधानसभा सदस्य आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. पावसाळी अधिवेशनाचे कामकाज चालविण्यासाठी पीठासीन सभाअध्यक्ष अँड.राहुल नार्वेकर यांच्याबरोबरच सभागृह चालविण्यासाठी तालिका अध्यक्ष म्हणून आ.सौ.सुलभाताई संजय खोडके यांचे नाव घोषित झाल्याने



सभागृहातील सर्व सदस्यांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी विधानसभेमध्ये मुख्यमंत्री ना. देवेन्द्रजी फडणवीस , उपमुख्यंमंत्री ना. एकनाथजी शिंदे , उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार देखील उपस्थित होते.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात साधारणत:आठ तासांचे कामकाज चालणे अपेक्षित असते . अर्थातच आठ तास पीठासीन अध्यक्ष त्या खुर्चीवर बसून राहू शकत नाहीत. त्यामुळे अध्यक्ष अनुपस्थित असतील तेव्हा सभागृहाचे कामकाज चालविण्यासाठी तालिका अध्यक्षांचे एक पॅनल तयार करण्यात येते. या पॅनलवर महाराष्ट्र विधानसभेच्या नियम ८ पोट नियम १ अन्वये तालिका सभाध्यक्ष म्हणून आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.

आ.सौ. सुलभाताई खोडके ह्या महाराष्ट्र विधानसभेवर तिसऱ्यांदा निवडून आल्या असून एक अभ्यासू व विधानसभेच्या कामकाजही उत्तम जाण असलेल्या जेष्ठ सदस्य म्हणून सुद्धा त्यांची सभागृहात ओळख आहे. विधानसभेत ज्या पक्षाचे आमदार जास्त असतात. त्या पक्षातील जेष्ठ सदस्यांची तालिका सभाध्यक्ष म्हणून अधिवेशन काळात घोषणा करण्यात येते. अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांची पावसाळी अधिवेशनाच्या तालिका सभाध्यक्ष म्हणून घोषणा झाली असून पीठासीन अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांच्या अनुपस्थितीत त्या अधिवेशनाचे कामकाज सांभाळणार आहेत.

# महादेवखोरी परिसरात डिलिव्हरी बॉयला चाकूचा धाक दाखवून लुटणाऱ्या ४ आरोपींना २४ तासात अटक, फ्रेजरपुरा पोलिसांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या गुन्हे शाखेने अवघ्या २४ तासात डिलिव्हरी बॉयला चाकूचा धाक दाखवून जबरीने पार्सल लुटणाऱ्या टोळीचा छडा लावत चौघांना अटक केली. यामध्ये दोन अल्पवयीन आरोपींचाही समावेश आहे. दि. २७ जून रोजी सागर पट्ले (वय ४०, रा. औरंगापुरा) हे एक्स्प्रेस बीज कुरिअर कंपनीतून डिलिव्हरी करत असताना, महादेवखोरी परिसरात एका नकली कॉलवर बोलावून घेतले गेले. तिथे आलेल्या चार तरुणांनी त्यांच्यावर चाकूचा धाक दाखवून १२ पार्सेल (किंमत १२,२०२ रु.) आणि खिशातील ७,३९५ रुपये असा एकूण १९,५९७ रुपयांचा ऐवज जबरदस्तीने हिसकावून नेला. पोलिसांनी तपासात सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी श्रीकांत उर्फ तेजस भुजबळ (वय २०) याला महादेवखोरी जंगलातून ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून ६ पार्सेल हस्तगत करण्यात आले असून, दोन अल्पवयीन आरोपींना बाल न्याय मंडळात हजर करून निरीक्षणगृहात पाठवण्यात आले. सदर कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त सागर पाटील व सहा. आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि रोशन शिरसाट, गुन्हे निरीक्षक निलेश गावंडे, पउनि राहुल महाजन व डीबी पथकाने केली.

# उद्धव ठाकरे गटाला रामराम करुन युवा स्वाभिमान पार्टीमध्ये प्रवेश
## उबाठाच्या भातकुली तालुका प्रमुखासह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा जंगी प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

युवा स्वाभिमान पार्टी ही प्रत्येक जाती धर्मातील लोकांसाठी काम करणारी पार्टी असुन या पार्टीचे संस्थापक अध्यक्ष आ.रवि राणा हे समाजातील तळागाळातील जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी नेहमी धडपडत असतात. गेल्या १५ वर्षापासुन जनतेच्या आशीर्वादाने व जनतेने टाकलेल्या विश्वासाने आ.रवि राणा हे बडनेरा विधानसभा मतदारसंघाचे आमदार असुन अशा या आपुलकीच्या नेत्यावर विश्वास ठेऊन तसेच आ.रवि राणा सारख्या दबंग नेत्यासोबत तसेच युवा स्वाभिमान पार्टीमध्ये कार्य करण्याकरिता अनेक पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्ते इच्छुक असतात. त्या अनुषंगाने गणोजा देवी येथील उबाठा गटाच्या शेकडो पदाधिकारी व



कार्यकर्त्यांनी उबाठा गटाला रामराम करतात युवा स्वाभिमान पार्टीमध्ये जंगी प्रवेश केला यामध्ये युवा स्वाभिमान पार्टीचे भातकुली तालुका अध्यक्ष मंगेश इंगोले पाटील यांच्या विशेष पुढाकाराने गणोजा देवी येथील उबाठाचे भातकुली तालुका प्रमुख योगेश साबळे, उपसरपंच राहुल बोरकर, धर्मराव देशमुख यांच्यासह श्याम जक्ताब, बंडु गायकवाड, राजु खंडारे, सुरज भातकुलकर, दामुभाऊ कोरडे, सुधाकरराव जिरापुरे, राजेश नकाशे, संजयभाऊ खोब्रागडे या पदाधिकाऱ्यांनी जंगी प्रवेश केला. यावेळी आ.रवि राणा यांनी प्रवेश घेतलेल्या प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे स्वागत केले. व युवा स्वाभिमान पार्टी ही तळागाळातील जनतेसाठी काम करणारी पार्टी असुन जनतेची सेवा हाच युवा स्वाभिमान पक्षाचा मुख्य हेतु असल्याचे सांगितले व त्यानुसार काम करण्याच्या सुचना सुद्धा दिल्या तसेच प्रवेश घेतलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, प्रत्येक कार्यकर्त्यांसाठी आ.रवि राणा हे आपुलकीचे नेते आहे. यावेळी श्रीकृष्ण बैलमारे, अवि काळे, राजा बागडे, श्याम कथे, कुणाल केवतकर व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.